


# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १३१ * नांदेड * रविवार, दि. १८ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# नांदेड जिल्ह्यात पुढील तीन दिवस वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

## हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी १७ मे २०२५ रोजी दुपारी १३ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १८, २० व २१ मे २०२५ या तीन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी केलेला आहे. हे तीन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा :** विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

**या गोष्टी करु नका :** आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# प्रसिद्ध लेखक आणि 'गार्गी'च्या दिग्दर्शकाची नागपुरात आत्महत्या



**नागपूर (प्रतिनिधी)–** प्रसिद्ध लेखक आणि चित्रपट दिग्दर्शक आशिष उबाळे यांनी नागपूरमधील रामकृष्ण मठात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. उबाळे यांनी कर्जामुळे आत्म हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

आशिष उबाळे हे मूळचे नागपूरचे असून ते महाल परिसरात राहत होते. आशिष उबाळे यांचा लहान भाऊ नागपुरातील रामकृष्ण मठाम ध्ये सेवेकरी म्हणून काम करत होता. त्यांना भेटण्यासाठीच आशिष उबाळे नागपुरात आले होते. रामकृष्ण मठाच्या गेस्ट रूम मध्ये ते मुक्कामी होते. त्यापूर्वी त्यांनी मठामध्ये जेवणही केलं होतं. शनिवारी दुपारी आराम करण्यासाठी गेस्ट रूम मध्ये गेले. त्यानंतर त्यांनी गळफास लावून आत्महत्या केली असावी अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

शनिवारी सायंकाळी आशिष उबाळे यांचा भाऊ सारंग त्यांना उठवण्यासाठी गेला असता रूम उघडली नाही. त्यानंतर हा सगळा प्रकार समोर आला. पोलिसांना मृत आशिष उबाळे यांच्या मोबाईलमध्ये व्हाट्सअपवर एक सुसाईड नोट आढळली. त्यामध्ये डोक्यावर प्रचंड कर्ज असल्याचे आत्महत्या केल्याचे नमूद आहे.

# येत्या जि. प. आणि महापालिका निवडणुका स्वबळावर लढवू आणि विजयी होऊ –उपसभापती नीलम गोऱ्हे



**नांदेड (प्रतिनिधी)–** येणाऱ्या आगामी महापालिका, नगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकीत शक्यतो महायुतीत निवडणूक लढवू, परंतु युती झाली नाही तर शिवसेना स्वबळावर निवडणूक लढविणार, असा निर्धार विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी केला. तर शिवसेना ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांची केवळ टीआरपीसाठी भंपकबाजी सुरु असते, अशी टीकाही उपसभापती गोऱ्हे यांनी केली.

शिवसेनेच्या वतीने लाडक्या बहिणींचा मेळावा घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नीलम गोऱ्हे या नांदेड दौऱ्यावर आल्या होत्या. त्याप्रसंगी दुपारी साडेतीन वाजता शासकीय विश्रामगृह येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार बाबुराव कोहळीकर, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, विनय गिरडे पाटील, महिला आघाडीच्या वनमाला राठोड, अपर्णा नेरलकर यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना उपसभापती गोऱ्हे म्हणाल्या की, लाडक्या बहिणींच्या पाठबळामुळे गत विधानसभेत महायुतीला भरघोस मतदान झाले. त्यांच्या आशीर्वादाने आगामी निवडणुका लढणार आहोत. जर महायुती झाली तर ठीक अन्यथा आगामी महापालिका व जिल्हा परिषदेमध्ये महायुतीला आनंदाचा धक्का देऊन शिवसेना या निवडणुका जिंकणार आहे. यावेळी त्यांनी शिवसेनेतील सक्षम महिला प्रतिनिधींचे कौतुक केले.

आ. बालाजी कल्याणकर तर राजकीय जीवनात यशस्वी झाले आहेतच, शिवाय त्यांच्या पत्नी सुद्धा सामाजिक सेवेद्वारे पुढे येत असून आ. बालाजी कल्याणकर यांच्या पत्नीचा गौरव त्यांनी यावेळी केला. पुढे त्या म्हणाल्या, शिवसेनेच्या आमदारांना कमी निधी मिळत असल्याच्या प्रश्नावर त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार दुजाभाव करत नसतात, त्यांनी दिलेला निधी हा प्रत्यक्षात यायला दोन महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे हा निर्णय लवकरच सर्वपक्षीय आमदारांना प्राप्त होईल. तसेच लाडक्या बहिणींसाठी विविध कर्ज योजना, आरोग्य योजना तसेच वयोश्री व तीर्थ कृषी योजनांमध्ये सहभाग वाढविणार असल्याचे त्यांनी सांगितले. लाडकी बहीण योजनेमधील असंख्य लाडक्या बहिणींना का अपात्र करण्यात आले? या प्रश्नावर उपसभापती नीलम गोऱ्हे मात्र चिडल्या. त्यांनी पत्रकारांकडून असे विधान अयोग्य असल्याचे सांगून त्यांनी या प्रश्नावर सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.

पत्रकारांनी नरकातील स्वर्ग या पुस्तकाचे लेखक व शिवसेनेचे ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांच्या भाजप नेत्यावरील आरोपाबद्दल बोलतांना उपसभापती निलम गोऱ्हे म्हणाल्या की, राऊत हे स्वप्ना पाटकरांना धमकावल्या मुळे व पत्राचाळ घोटाळ्यामध्ये जेलमध्ये गेले होते. ते कांही स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी झाले नव्हते. केवळ टीआरपी वाढविण्यासाठी त्यांची ही भंपकबाजी चालू असते, असे गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

# दिल्ली महापालिकेत महाराष्ट्र पॅटर्न, 'आप'चे १३ जण फुटले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्ली विधानसभेची सत्ता गेल्यानंतर आता अरविंद केजरीवालांच्या आप पक्षाला आणखी एक धक्का बसला आहे. दिल्ली नगर निगम म्हणजे महापालिकेमध्ये १३ नगरसेवकांनी आप पक्षाला रामराम करत वेगळा गट तयार केला आहे. हेमचंद गोयल यांच्या नेतृत्वाकाली १३ जणांनी आप पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत इद्रप्रस्थ विकास पार्टी नावाने वेगळा गट तयार केला आहे. मुकेश गोयल हे या पक्षाचे नवे नेते असतील.

गेल्या महिन्यात एमसीडी निवडणुका पार पडलेल्या. त्यामध्ये भाजपचे इक्बाल सिंह हे महापौर बनले होते. त्यांनी काँग्रेसच्या मनदीप सिंह यांचा पराभव केला होता. या निवडणुकीवर आपच्या नगरसेवकांनी बहिष्कार टाकला होता. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने हा आदेश दिल्याची माहिती आहे. त्यामुळे बरेच नगरसेवक नाराज असल्याची चर्चा होती. आता त्याम धील १३ नगरसेवकांनी आपचा राजीनामा (पान ६ वर...)

# इंद्रायणीच्या प्रवाहातील २९ बंगल्यावर चालले बुलडोझर

**पिंपरी चिंचवड (प्रतिनिधी)–** पिंपरी चिंचवड शहरातील चिखली परिसरात इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत बांधलेल्या २९ बेकादेशीर बंगले आणि इतर बांधकामे पाडण्यावर रहिवाश्यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेला अपील अर्ज फेटाळला आहे, त्यामुळे हरित लवादाने दिलेला निर्णय कायम ठेवत, ३१ मे पूर्वी ही नदीपात्रातील बांधकामे पाडून नदीचे मूळ क्षेत्र पुन्हा मूळ स्थितीत आणण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. शनिवारी पालिकेच्या पथकांनी अनेक बुलडोझर आणून एकाचवेळी २९ बंगल्यांच्या तोडकामाला प्रारंभ केला. या तोडकामामुळे चिखली परिसरात उद्ध्वस्त झालेले बंगले दिसत आहेत. हे दृश्य गाझा पट्टीतील उद्ध्वस्त इमारतींसारखे दिसत आहे.

रिव्हर व्हीला प्रोजेक्टमध्ये एकूण ३६ बंगले आहेत. पैकी २९ रहिवाशी न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने मात्र बंगले जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले, त्यामुळं आता या प्रोजेक्ट मधील ३६ ही बंगले जमीनदोस्त करण्याची कारवाई होणार आहे. शनिवारी सकाळी ८ पर्यंत २५ टक्के काम ही पूर्ण झालं आहे. उर्वरित ७५ टक्के काम रात्री उशरापर्यंत पूर्ण करण्याचं उद्दिष्ट आहे.

इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत मधील २९ बंगल्यावर शनिवारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका पोलीस बंदोबस्तात कारवाईला सुरुवात झाली होती. पहाटे पासून बंगले जमीनदोस्त करण्याची कारवाई पालिकेने हाती घेतली होती. सुप्रीम कोर्ट आणि राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयानुसार सर्व बंगले पाडले गेले. चिखलीतील सर्व्हे नंबर ९० मध्ये बंगलो प्लॉट बांधकाम प्रकल्प करण्यात आला होता.

# चार कोटी रुपयांच्या शासकीय रकमेचा अपहार

## शिवाजीनगर ठाण्यात प्राचार्यासह दहा जणांविरुद्ध गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शासन निर्णयाचे उल्लंघन करून आपल्या पदाचा दुरूपयोग करत शासकीय तंत्रनिकेतन नांदेड येथील तीन आणि इतर सात जणांनी संगणमत करून शासनाच्या ४ कोटी ४ लाख ५ हजार ८९६ रुपयांचा अपहार केला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




पुण्यात राहणारे अभिजित भागवत खेडकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सन २०२२ ते २०२४ दरम्यान शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य नागेश एल. जानराव, सहसंचालक नाशिक विभागाचे गोरक्षक व्ही. गर्जे आणि शासकीय तंत्रनिकेत नांदेड येथील प्रकाश डी. पोफळे यांनी इतर सात आरोपींमार्फत संगणमत करून शासनाच्या महसुल उत्पन्नावर आधिपत्य व नियंत्रण असणारे लोकसेवक असताना शासन निर्णयाचे जाणून-बुजून उल्लंघन केले. आपल्यासाठी व इतर आरोपींसाठी बेकायदा गैरलाभ घेवून शासनाची ४ कोटी ४ लाख ५ हजार ८९६ रुपयांची फसवणूक केली आहे.

याप्रकरणी नांदेड येथील शिवाजीनगर पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९, ३४ प्रमाणे गुन्हा क्रमांक १९६/२०२५ दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरिक्षक जालिंदर तांदळे करत आहेत.

# बंगालच्या उपसागरात 'शक्ती' चक्रीवादळाचा इशारा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – बंगालच्या उपसागरात 'शक्ती' या चक्रीवादळाच्या निर्माणाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. पुढील काही दिवसांत चक्रीवादळात रूपांतरित होऊ शकते. हे वादळ २३ ते २८ मेच्या दरम्यान ओडिशा, पश्चिम बंगाल व बांगलादेशाच्या किनारपट्टी भागांना धडकू शकते. हवामान खात्याने ओडिशा आणि पश्चिम बंगालसह संपूर्ण पूर्व किनारपट्टीला सतर्कतेचा इशारा दिला आहे. मासेमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# युट्युबर ज्योती मल्होत्राच्या मुसक्या आवळल्या; पाकिस्तानी गुप्तचर एजंटांशी संपर्क ठेवत संवेदनशील माहिती शेअर केल्याचा आरोप

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** हरियाणातील ट्रॅव्हल युट्यबर ज्योती मल्होत्राला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. आतापर्यंत पंजाब आणि हरियाणातील मालेरकोटला येथून एकूण ६ पाकिस्तानी हेरांना अटक करण्यात आली आहे. ज्योती मल्होत्रा ही पाकिस्तान उच्चायुक्तालयात काम करणाऱ्या दानिश नावाच्या अधिकाऱ्याच्या संपर्कात होती आणि दानिशने तिला पाकिस्तानला पाठवले होते. ज्योती मल्होत्रा स्वतःचे ट्रॅव्हल चॅनल चालवते, ती पाकिस्तानलाही



गेली होती आणि पाकिस्तानमध्ये अनेक गुप्तचर माहिती शेअर करत होती.

चौकशीदरम्यान ज्योती मल्होत्रा हिने पोलिसांना सांगितले की तिचा 'ट्रॅव्हल विथ-जो' नावाचा युट्यूब चॅनल आहे. ती पासपोर्टधारक आहे आणि २०२३ मध्ये पाकिस्तानला जाण्यासाठी व्हिसा मिळवण्यासाठी ती दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयात गेली होती, जिथे तिची भेट अहसान-उर-रहीम उर्फ दानिशशी झाली. तिने अहसान-उर-रहीम उर्फ दानिशचा मोबाईल नंबर घेतला होता आणि नंतर त्याच्याशी बोलू लागली.

त्यानंतर ती दोनदा पाकिस्तानला गेली जिथे दानिशच्या सांगण्यावरून ती त्याचा ओळखीचा अली अहवानला भेटली, जिथे अली अहवानने तिच्या राहण्याची आणि प्रवासाची व्यवस्था केली. पाकिस्तानात अली अहवानने पाकिस्तानी सुरक्षा आणि गुप्तचर अधिकाऱ्यांसोबत तिची भेट घडवून आणली.

ज्योती दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील अधिकारी अहसान-उर-रहीम उर्फ दानिशला अनेक वेळा भेटत राहिली. ज्योतीच्या चौकशीतून असे दिसून आले आहे की ती पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या संपर्कात होती. ज्योतीने संशयास्पद कारवाया करून आणि शत्रू देश पाकिस्तानच्या एका नागरिकासोबत भारतीय गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करून भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आणण्याचा गुन्हा केला आहे.

# दहशतवादाविरूद्ध भारताची भुमिका मांडणाऱ्या शिष्टमंडळात थरूर, सुप्रिया सुळे

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताने दहशतवादाविरोधात कठोर भूमिका घेत त्यांचा नायनाट करण्याासाठी महत्वाची रणनिती आखली आहे. त्या मोहिमेअंतर्गतच संसदीय कामकाज मंत्रालयाद्वारे दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका मांडण्यासाठी परदेशात एक शिष्टमंडळ पाठवण्यात येणार आहे, त्यामध्ये काँग्रेस नेते शशी थरूर तसेच सुप्रिया सुळे यांच्यासारख्या मोठ्या नेत्यांचाही समावेश असणार आहे.

देशातील सर्व राजकीय दलांची ४० खासदारांची टीम सात गटात विभागली जाणार असून ते विविध देशांत जाऊन ऑपरेशन सिंदूरबद्दल भूमिका मांडत पाकिस्तानचा पर्दाफाश करणार आहेत. विशेष म्हणजे, मोदी सरकारने या खास मोहिमेच्या नेतृत्वाची जबाबदारी काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांच्याकडे दिली आहे. यासह, थरूर आता अमेरिकेत भारताची बाजू मांडतील आणि पाकिस्तानचा बुरखा फाडतील.

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत, भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त करून एक कडक संदेश दिला. या निर्णायक कारवाईला केवळ जनतेकडूनच नव्हे तर विरोधी पक्षांकडूनही पूर्ण पाठिंबा मिळाला. देशातील राजकीय पक्षांची विचारसरणी वेगवेगळी असली तरीही जेव्हा देशाच्या सुरक्षेचा आणि दहशतवादाविरुद्ध एकतेचा प्रश्न येतो तेव्हा संपूर्ण राजकीय नेतृत्व एकजूट असल्याचे चित्र यावेळीही दिसून आले. भारताची हीच राजकीय एकता आता जगभर दिसणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी खासदारांचे एक शिष्टमंडळ ८ वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवले जाईल, असा निर्णय सरकारने घेतला आहे.

# हळद संशोधन क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल ना. हेमंत पाटील यांचा 'सीएएसएमबी'कडून विशेष सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** मा.बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून हळद उत्पादन आणि त्यावरील प्रक्रिया उद्योगात उत्कृष्ट योगदानाबद्दल मुंबई येथे चेंबर फॉर अडवांसमेंट स्मॉल अँड मीडियम बिझनेस (सीएएसएमबी) यांच्या वतीने हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे नामदार हेमंत पाटील यांचा सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या हस्ते विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या नामवंतांचा सत्कार करण्यात आला.

सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालय भारत सरकार यांच्या सहकार्याने आणि चेंबर फॉर अडवांसमेंट स्मॉल अँड मीडियम बिझनेस (सीएएसएमबी) यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंतांचा गौरव व पुरस्कार देऊन सत्कार सोहळा मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. मागील ५-६ वर्षांपासून हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे नामदार हेमंत




पाटील यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे काम सुरू आहे. या माध्यमातून मराठवाड्यासह विदर्भातील हळद उत्पादक शेतकऱ्यांना हळद उत्पादनात भरभराट व्हावी उद्देशाने काम सुरू आहे. या केंद्राची दखल केंद्र व राज्य स्तरावर घेण्यात आली असून यासाठी राज्य शासनाने ८०० कोटींचा भरीव निधी मंजूर केला आहे व वसमत येथे हळद संशोधन केंद्राचे काम सुरु आहे. या केंद्राच्या माध्यमातून भविष्यात शेतकऱ्यांना हळद उत्पादनात लाभ होणार आहे. नामदार हेमंत पाटील यांच्या याच योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये अनेक लकांनी केलेली प्रगती पाहून खरंच नवीन स्टार्टअप करणाऱ्या तरुणाचा अभिमान वाटला. अन्न प्रक्रिया उद्योग जितका मोठा होईल त्याचा फायदा इथल्या माझ्या सर्व सामान्य शेतकऱ्याला होईल, तसेच बेरोजगार तरुणांनी आपली शक्ती कौशल्ययुक्त उद्योगामध्ये रूपांतरित करून या देशाच्या प्रगतीत हातभार लावावा, असे मनोगत नामदार हेमंत पाटील यांनी व्यक्त केले.

या सोहळ्याला राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, महिला बाल कल्याण राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर-साकोरे, एफडीसीए गुजरात हेमंत कोशार, सीएएसएमबी अध्यक्ष निलेश लेले, संचालक एफ टू एफ उमेश कांबळे, सीएएसएमबी प्रबोध हळदे, व्यवस्थापकीय संचालक संजय मारीवाला इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# आरसीबीविरूद्ध केकेआर सामना पावसामुळे रद्द

**मुंबई (प्रतिनिधी)–** आयपीएलच्या १८ व्या मोसमातील ५८ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स आमनेसामने होते. या सामन्याचं आयोजन हे बंगळुरुतील एम. चिन्नास्वामीस्टेडियममध्येकरण्यात आलं होतं. मात्र पावसामुळे हा सामना रद्द करण्यात आला आहे. स्टेडियम आणि आसपासच्या परिसरात गेल्या काही तासांपासून पावसाची जोरदार बॅटिंग सुरु होती. त्यामुळे बराच वेळ पाऊस थांबण्याची आणि खेळपट्टी कोरडी होण्याची प्रतिक्षा करण्यात आली. मात्र खेळ होऊ शकणार नसल्याचं स्पष्ट होताच सामना रद्द करण्याची घोषणा करण्यात आली. आयपीएलकडून एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन याबाबतची माहिती देण्यात आली आहे. आयपीएलच्या १८ व्या मोसमातील सामना पावसामुळे रद्द होण्याची ही तिसरी वेळ ठरली.

# जिंदगी काय असते?

## वऱ्हाडी कथा

आकोला जिल्ह्यात एक ऊलिस गाव. थ्या गावाच नाव सांगळूद. अंबा मायचं सांगळूद ही त्याले म्हतल्या जाते. चार पाच हजाराच्या आसपास लोकसंख्या असलेलं हे टुमदार गाव आकोल्याहून दा किलोमीटरवर .

थ्या गावात एक खुशहाल जिंदगी जगनार एक खटलं होतं. नवरा बायको अन तेयले दोनं पोरं. मोठ्या पोराचं नाव रविंद्र अन लायन्या पोराचं नावं सुभाष. नवरा बायको दोघही दुसर्याच्या वा-वरात मोलमजूरी करून पोट भरत. लायना पोरगा सुभाष ह्याले पोलिओ होयेलं होता. तरी शायेत धावन्याच्या शर्यतीत थो थ्याच्या दुडक्या चालीनं पयला नंबर आने.

पांड्या मातीचं भलमोठ्ठं घर. भीती दो दो हाताच्या. आळं सागवानी होतं नाटायचं. घरात लाईन नसल्यानं दिसरात घरात चिळी जयत राह्ये. चुलीच्या वरच्या धुरांड्यातून दुपारी ऊलीसा ऊजीळ घरात येये. घराच्या एका कोपर्यात जातं. त्याच्या तोंडात सुभाष च्या मायनं पालू घालून ठेवला होता. चक्की आल्या पासूनं. कोपर्यात मडक्याची ऊतरंडी होती. त्याच्यात दायदाना, कुरळ्या, शेव्या,पैसा अदला सुभाष ची मायं ठेवे. एक जल्मरीचा पसरता डब्बा होता. त्यात साखर्या ठेवे. अन एका लोखंडाच्या पसरत्या डब्यात ऊळदाचे पापळ ठेव्ये . एका ऊलश्या गाळग्यात दोनं तीनं सालाचं मुरलेलं रायतं राह्ये. चुलीले ऊलीसा कनोळा केला होता. अंगारडबी सरदवू नये म्हणून सुभाष ची मायं थ्या कनोळ्यात अंगारडबी ठेव्ये. चुलीच्या शेजी सरपनं सुभाष सदाई आनून ठेव्ये. चुलीच्या डाव्या बाजूले भितीत एक मोठा कनोळा होता. त्यात एक गजानन बाबाचा फटू, पीतयीच्या दोन तीनं देवाच्या लान लान मुरत्या. पाण्याचं पीतईचं बुटलं, पीतईचा दिवा. अगरबत्तीच जल्मरीचं स्टँड.

सार घर धुपटानं कायकुटं होयेल. फकस्त दिवाई च्या अगूदर त्याच तोंड पांड फटक होये. आंगन लयचं मोठ्ठजात ऐसपैस. आंगनात टमाटे, वांगे, संभार, मिरच्यायचे रोपं. कुपावर चळलेले कारल्याचे अन दोळक्याचे येलं. आंगनात टुमदार निंबाच, पयसाच, वळाच,पीपयाचं, ऊंबराचं, सीताफयाचं , जांबाचं, कन्हैराच्, दाळींबाच एक एक झाळ. आंगनाच्या मध्यात मातीचं चौकुट्टी बिन्दाबन अन थ्यात भलीमोठ्ठी हिरवीगार तुयशी लदबद लागलेली मंजिरी.

सुन्याले मस्त वाटे सुभाष च्या घरी गेला की, त्याले अस वाटे ततीसाच बसून राहावं. राती थ्या सुभाष च्या आंगनातल्या झाळायवर पूर्व दिशेनं पाखरं झेप घेतं खोप्यात जमा होतं. दा बारा खोपे ही होते थ्या झाळावर. सकायं,संध्याकाय झाली की, सुभाष च्या आंगनात पाखरायचा नीरा कलकलाट राह्ये. मिठू, चिमन्या, कावळे, कबूतरं, पिंगळे, धिवरं सारे पाखरं कलकलाट करून वार्यावर तेयच्या मधूर स्वराची एक गोळ लकेर सोळूनं देत. ऊन्हायात त सुभाष च्या आंगनात दाट सावली पळे. सावली थंडीगार लागे. ऊन्हायात दुपारच्या टायमाले जर बाज आंगनात टाकली की,मटकन झोप लागे.

सुभाष चे माय बाप लयचं मयाळू हो-ते. सुन्या शनवारच्या दिशी जर त्याच्या घरी गेला त थे त्याले हटकून कागदावर भातकं देत. भातक्याचा थो खमंग वास त्याले कस्तूरीमय वाटे. सेव चिवळ्याच भातक, जिलेबी, म्हैसूरं पाक, रेतीतले पोंगे अन नया, बुंदा, रेवड्या, बालु शाही मुरमुरे फुटाने, दालव्या. यापैकी कांहीतरी सुभाष चा बापं सुन्याले दे .तो ही मंग अंधारात मिटक्या मारत लपूनं खावून घेये. अन तोंड सदर्याच्या अस्तीनीले पुसून घरी जाये .

शनवार ह्या दिवशी सांगळूद चा भल्ला मोठ्ठा बजार भरे. वर्हाडातला सार्यात मोठा बैलाचा बजार अतिसा आजही भरते.

सुन्या अन सुभाष दोघही भटककोंबळे. बजार म्हतलं की दोघायले लयचं हरिक येये. दोघंही सारा बजारभर फेरफटका मारूनं येत. एकमेकाच्या खांद्यावर हात ठेवूनसन्या मस्त बजारातले रेडूचे गाने आयकतं फिरतं. दुपारच्या तीन चार वाजल्यापासून दुरदुरच्या गावातून आलेले लानं लानं व्यापारी लोकं तेयचं ईकाचं सामानं बंड्यायनं घेवून येत . तेयच्या नेमलेल्या जागावर पाला टाकत होते. बांबू, ऊभे केले जात होते. खुट्या घनानं ठोकल्या जातं होत्या. दोर्यायनं पालायले तानं देल्या जात होता. मस्त पाली टाकलेले लोकं कोनी भाजी ईके, कोनी भातक, बुंदा, शेवचिवळा, म्हैसूरं पाक, बालुशाही, गुय, पानं, मसाला, तमाखू, ऊस, भांडे, आयते कपळे, चपला, बायाचं सामान कुकू, टिकल्या, पीना, पावडर,काजयं, मसोया, चिकन, मटनं, फुटाणे ,मुरमुरे, लेवळ्या, पाहूनसन्या मन भरूनं जाये.

चा वाला कॅटली घेवून पांडे कप वाजवत चा थ्या दुकानदारायले देत होता. पानं, गुटका , खर्रा बनवनारा टपरी गयातं लटकवूनं घेवूनसन्या बजारभर फिरतं होता. मंग दोघही फेरी मारत. शेजीचं असलेला बैल बजारात. ह्या बजारात दुरदुरच्या गावातूनं आलेले बैल पा ची लयच मजा वाटे. काह्यी कबरे, काही लाल, काही पांडे, काही काये. तसा सुन्या लयचं ईचकट बैलाचं शेपूट धरे. बैलानं पाय ऊचलला की लगेच मांग फिरे. तरनेबांड गोरे ततीसा पा ले भेटे. मंग सुन्या अन सुभाष बैलाचे पवटे जमा करून घरी नेवून आंगनात टाकत. दोन चार राऊंड मारले की, चार पाच टोपल्याचं शेनं जमा होये. मंग मस्तपैकी राखोंडी खाली पसरवून गवर्या थापूनं घेत. हे तेयच दर बजारी ठरलेलं काम...हात पाय धूवून चड्डी ले हात पुसून डबल बजारात फिराले जात. जसी जसी संध्याकाय होये. तस तस तेयले दुख होयं.

भाजीपाल्यावाले तेयच्या पालाचे बांबू आडवे पाळून अन लोखंडी खुट्या ऊपटून पाल खाली पाळून घळ्या मारूनं बंडीत टाकत. सुन्याले लय खराब वाटे. सारे लोकं आवरत घेत. जो दाम येईन त्या दामात लोक माल ईकून टाकत. सारा गजबजलेला बजार आता अल्लादी अल्लादी कमी होत होता. गॅसबत्यायचे फुगे फुटले जात होते. मोठमोठाले टेंभे ईजवल्या जात होते. न ईकलेले बैलं गाव-तच पुळच्या बजारासाठी सरपंचाच्या गोठ्यात बांधले जाचे. तयनाचा वास बजारभर भिरभीर वार्यावर घुटमयत.. घुमत होता. बजाराच्या जागेवरचे मातीचे वटे रिकामे होत होते. अन चार भोक पळलेले वट्याभवती दिसूत येत होते. आता सारा बजाराच्या जागी अंधार पसरला होता.

ततीसा कुत्रे भटकत होते. जे खा ले भेटनं थे खात होते. मटनाचे तुकळे, कोंबळ्याचे पाय अनं मुंडके. असा हा बजार ज्याची सारेच लोकं आतूरतेनं वाट पाहाचे. ह्या बजारातच लोक देनं घेनं ही चुकत करत असत. मोलमजुरीचे पैसे देत घेत असत. सुभाष अन सुन्या दर इतवारी निंद-ाले कापसाले जात. थ्याच पैशातून शाळेचा खर्च भागवत. एका दिवशी सयसंध्याकायी सुभाष च्या मायची एकाएकी तब्येत बीगळ्ळी. त्याच्या बापानं आकोल्यात न्याले ॲटोत घातलं पन थ्या माय मावली नं यावलखेड ह्या गावाजौळचं दम सोळला. सुन्याले जस कयलं थो धावतच सुभाष च्या घरी गेला. सुभाष लयचं हमसू हमसू लळत होता. सुन्याले ही आसू आवरत नोते. थे मयाळू मायं सुभाष ले सोळून गेली होती.

मंग काही वरषानं दोघंही मॅट्रीक पास करून आकोल्याचा शिवाजी कॉलेजले ॲडमिशन घेतली. दोघही दा किलोमीटर सायकल चालवत जात. सुभाष च्या बापाचा ॲटोन ॲक्सीडेन्ट झाला होता. त्याचा बाप लंगळा झाला होता. तो ही काही दिवसान देवाच्या घरी गेला.

सुभाष च्या भावाचं लगन झालं. दुसर्याच वरषी त्याच्या भावाच्या पायाले गॅंगरींग झालं होतं. डॉक्टर म्हने पाय तोळा लागनं. पन त्याच्या भावानं पाय तोळाले नकार देल्ला. मंग त्याचा भाऊ ही मरन पावला. सुभाष ची वयनी तीच्या माहेरी चालली गेली.

आता सुभाष थ्या घरात एकटाचं राह्यला होता .मंग सुभाष च्या मामानं भाकरतुकळ्यासाठी सुभाष च लगन लावून देल्ल. त्याची बायको चार वरष राह्यली अन थे ही माहेरी गेली अन आलीचं नाह्यी.


आता सुभाष एकलाच हायं. घर जरजरीत होवून पळून गेलं. थ्या घराच्या शेजीच त्यानं तुराट्याचं घर बांधल वरूनं टिनं टाकले. पायानं अपंग असलेला हा सुभाष . सायकल रिपेरिंग च काम करून थो सोता भाकर तुकळा करून आपल पोटं भरते. दुख एवळच हायं की किती मस्त खटलं होत. सारे खुस होते. दैवानं अस कामून करावं. अनं शासनं जेयले घरं हायेत तेयले घरकुल पास करून लाखो रूपयाचे चेक देतात. पन ह्या एकट्या, अपंग सुभाष कळे शासनाचं अजूनही लक्ष नाह्यी. याचं मनोमनं दुख होते.

ह्या शासनानं त्याले आताही घरकुल मंजूर केल नाह्यी. थो थ्या पळक्या, तुराट्याच्या ,टिनाच्या सात बाय सातच्या घरात एकटाचं राह्यते...एकटाचं राह्यते...एकटाच राह्यते...आज ही थ्या गावात जावूनं पा सायकलं रिपेरिंग च काम करनारा सुभाष आताही गावात पाय टाकल्या बराबर आपल्याले दिसून येईन..

शासनाने सुभाष ले घरकुल मंजूर करावं....बस्स यवळचं...

**– सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो.९७६९२०२५९७

# गाव संस्कृतीच्या वर्तमान व भविष्याचा वेध घेणारी कविता : गावपण हरवत चाललंय




गावगाडा व तेथील चालीरीती ह्या संस्कार संस्कृतीचे माहेरघर आहेत. जगात अनेक संकल्पना, संस्कार व संवेदना कालानुरूप बदलत आहेत. पण बदलत्या परिप्रेक्षात गावा बदलायला वेळ लागते. ग्रामीण भागातील बदल हा शहराच्या मानाने मंद असतो. त्या हळुवार बदलानेही गावाच्या अनेक परंपरागत चालीरीती बदलाचे ओरखडे गावातील लोकांच्या मनावर उमटत असतात.जुन्या पिढीला ते असह्य होत असतात.

आदिवासी, काबीला, तांडे, वाडी, वस्ती,गाव व शहर असे अनादी काळापासूनचे अनुक्रमे बदल आहेत. मागील तीन दशकात शहरीकरणामुळे गा-वाचा इतिहास व भूगोल पार बदलून गेला आहे. पण काही गावं प्रगतीच्या सर्व प्रवासातून दूर दरास व डोंगरी भागात असल्याने ती ओस पडतात की काय अशी भीतीही वाटते आहे.

सुखात एकमेकांना सामावत व दुःखात मदतीला धाऊन येणारे गाव ही गावाची खरी ओळख आहे. पंचमी, पोळा, दसरा, दीपावली, ईद व मोहरम सगळे सण जातीभेद दूर ठेवून सर्व लोक एकत्र येऊन साजरे करत असतात. एकमेकांच्या अडीअडचणीला धावून जातात. एकमेकांच्या संस्कृती व परंपरेचा आदर करतात. मदत, सहकार्य व देवान घेवाण यातून ग्रामीण समाज कौटुंबिक धाग्याने बाधला गेलेला आहे. लग्नसमारंभ व कार्य प्रसंगी सर्वाजन एकमेकांना मदत करत असतात.भजन, किर्तन व सप्ताह या सारखे कार्यक्रम सर्व समाजातील लोक एकत्र येऊन साजरे करीत असतात. नातीगोती याही पलीकडे जाऊन लोक एकमेकांच्या भावभावनांचा आदर करतात. तेथे व्यवहारापेक्षा तन, मन व धनाने माणूसकी या नात्याची जपवणूक जीवापाड केली जाते.

आपली माणसं व आपल्या हक्काचे ठिकाण म्हणून गाव प्रत्येक व्यक्तीस प्रिय असते. तरीही शिकून शहरात स्थायिक झालेली पिढी मात्र गावाकडे दुर्लक्ष करते. नव्या पिढीला सांगायला गाव लागते पण ज्यांच्या अंगाखांद्यावर खेळत मोठे झाले त्या खांद्याला विसरते. त्यांचा आधार बनायला या पिढीकडे वेळ मुळीच नसतो. गावात आता फक्त म्हातारी व कास्तकरी पिढी उरलेली दिसते. त्यांचीच मुले पाहूणे म्हणून तरी गावाकडे फिरेणाशी झाली.बोटावर मोजण्याइतके तरूण गावात आ-हेत. गावाकडील आई वडील यांचा सांभाळ करुन नौकरी करत असतात. पण गावातील राजकारण त्यांना बसू देत नाही. नको तो उपद्व्याप त्यांच्या मागे लागतो. मग ते लेकरांचे शिक्षण म्हणून गाव सोडत आहेत. सुट्टी व रविवार या दिवशी गावाला वळसा घालून फक्त शेताकडे जातात. गावाकडे ढुंकूनही बघत नाहीत. गावात शैक्षणिक वाता-वरण नाही. गावात नौकरी नाही. राजकारण व भाऊबंदकी यांचा त्रास यामुळे गाव सोडून बाहेर पडलेले असे अनेक प्रकारचे लोक शहरात राहून गावकर झाले आहेत.

**पुस्तक परीक्षण**
**व्यंकटेश सोळंके**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२

पूर्वी गावात शेतकरी,बलूतेदार व मजूर असे तीन वर्ग होते.आता जातीपातीचे राजकारण करून गावात अनेक गट तट व वर्ग तयार झाले आहेत. बलूतेदाराने बलूतेदारी करणे बंद केले आहे. ते काम त्याला खालच्या दर्जाचे वाटत आहे. शेतीत राबणारा वर्ग कमी झालेला आहे. बैलगाडी,औत, अवजारे,चाडे नळे,तिफन,जूव वखर यांची जागा आता यंत्राने घेतली आहे.

खळे,रास,ढवारा,अंबिल,राशन व मळणी या शब्दांना एकेकाळी असलेले वलय आता कालबाह्य झालेले आहे. अंग मेहनत करायला कोणीही तयार नाही. एकोपा, सुसंस्कृती ,माणूसकी, निखळ प्रेम, नात्यातील ओलावा, देवाणघेवाण व आदरभाव या सगळ्याचे एकत्रित मिश्रण म्हणजे गावपण होते.

आता खेड्यांची गावकी, गावगाडा, गावधन, गावकळा व गावपण हरवत चालले आहे, असे कवीने 'गावपण हरवत चाललंय' आहे या कवितासंग्रहाच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. गावातील माणुसकी संपत चाललेली आहे. अस्मानी संकटे व मालाचे भाव यामुळे शेती व शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.

मातीची कूस उजवता उजवता शेतकरी निसर्गाचे अनेक घाव सहन करत असतो. मग मातीच्या भरवशावर बघितलेली सर्व स्वप्ने गाभडून जात आहेत. अशीच ससेहोलपट तो नित्यनेमाने सोसत असतो. दलाली, लाचखोर व भ्रष्टाचाराच्या काळात टेबलाखालून दिल्याशिवाय रयतेची कामे मार्गी लागत नाहीत. अशा खाबूगिरीवाल्यांनी अनैतिक कामाचा कळस गाठलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यास शेतीची किळस येत आहे.

भ्रष्टाचाराने केव्हाच
गाटला आहे कळस
खाबूगिरीची रयतेला
येत आहे किळस

सालभर काबाडकष्ट करून पिकविलेले पिक शेतकऱ्यास मोत्यासारखे वाटते. मेहनतीला मोत्यासारखी दाणे येतात. घामातून आलेले पीक शेतकऱ्यांना आनंद देऊन जाते.जेव्हा घामाचे मोल दलांना कळत नसते .कळूनही तो सोंग घेतो.तेव्हा शेतकरी त्यांना शाप देऊन मोकळा होतो.

पाऊस व बि-भरण यांच्या मेळावर शेतकरी शेतीचा जुगार खेळतो. नापिकी झाली तरी तोल सांभाळून जगतो.

जगण्याचे होकायंत्र बिघडले असले तरी पुढचे पीक झक्कास येईल याची तो आस धरतो.

कुणबी हळदीची हळकुंड शिजवून सोनपिवळी करतो. कष्टाचे सोने होते. पण तळपायात पडलेल्या भेगावर हळद लावायला वेळ मिळत नाही. तप्त वाफा ,ऊन व वादळ यांची तमा तो कधीच करत नाही .सावलीला विसावा अविरत कष्ट उपसण्याची तयारी ठेवतो.शिजवलेली पिवळी हळकुंड व्यापाऱ्यास देऊन त्याची हातं पिवळी करतो. सगळं फेडाफेड करून भेगाळलेले तळहातावर भविष्य बघत पुढच्या मालाचे स्वप्न बघतो.

गेला जरी मुग तरी
सोया झक्कास येईल
दारी येईल लक्ष्मी
रब्बीला बरकत देईल

शेतकऱ्यानी अनेक खस्ता खाऊन पोरांना शिकवलेले असते. सातबारा गहाण ठेवून डोनेशन दिलेले असते. पोरांचे बिन पगारी म्हातारपण बघून बाप अंथरुणात खिळलेला असतो. व्यवस्थेच्या विरुद्ध बंड पुकारून पोरगं थकलेलं असते . तसा शेतीत काम करून बापही गळालेला असतो. वेटर ,मोल मजुरी व पडेल ते काम करून पोरगं संसार भागवते.

शिकून पोरं बेरोजगार होऊन फिरत असतात. जातीपातीचा राजकारणात नेत्याकडून वापरले जा-तात. जाळपोळ दंगल घडवून आणण्यात सुशिक्षित बेकार चांगले कामी येतात. असे नेत्यांना माहिती आहे . काम कायमचं नसते आयुष्याची गणित सोडवताना नकळत बेकार पोरं अशा कामी अडकून पडतात. जन्माला आल्यानंतर येथील मुक्काम पक्का नसतो. तरी अविरत कामासाठी आदळ आपट करावी लागते.

महागाई आणि विकासाचा
नको ताण घेऊ
सगळ्यांना रोजगार देऊ
सोबतीला कुणाला ठेवू
चल भाऊ
दंगल पेटवून देऊ

सामाजिक जीवनात लौकिकतेच्या मागे लागलेल्या लोकांची संख्या जास्त आहे. एकमेकाची वाहवा करून अथवा अनेक पुरस्कारांच्या माध्यमातून प्रसिद्धीच्या झोतात राहण्यात लोक स्वारस्य मानत आहेत. ज्यांच्या खांद्यावर लिख-णातून सामाजिक व सद्य वास्तव परिस्थितीचे जागर करण्याची जबाबदारी असते. तेच सामाजिक वास्तवतेची कनव न बाळगता आपलेच भले करण्यासाठी स्वतःला मिरवण्यात माहीर झाले आहेत.

एक कईता दोस्ता
मज्यावर लिव
मी तुव्ह वाजवितो
तु मव्ह वाजिव

गावातील पारावर रंगणारी मैफिल व ओट्यावरच्या गप्पा कालबाह्य झाल्या आहेत. मैत्री ,प्रेम व नाते यासाठी मनात असलेला हळवा कप्पा घरात आलेल्या डिजिटल मिडियाने हा-तात घेतला आहे. खिशात फोन डोक्यात विचार संवाद मेसेजशिवाय होत नाहीत. हॉटस्पाट ,डेटा, जीबी, स्टोरेज, गॅलरी यामध्ये माणूस हरवून गेलेला आहे. पोरासोरांनी चंगळवाद , व्यसन व ऐशोअ-ारामासाठी तुकडा तुकडा करून जमीन विकली. पिढ्यानपिढ्याचा वारसा सांगणारा सातबारा फ ुकला. बैल विकले. बैलपोळा सणवार साज शृंगार सगळे संपले. गाव शिवार पार , ओटा , आईवडील या सगळ्यांना नव्या पिढीने परके करुन सोडले.

डिरकायचा आखरावर
प्रत्येकाचा बैल
घरोघरी यंत्र आलं
कासरा झाला सैल
किंवा
मुक्या झाल्या घागरमाळा
हरवला झुलीचा साज
यंत्र युगात कुठे हरवला
वृषभराजाचा आवाज

शेतकऱ्यांच्या आयुष्यात पेरणी व सुगी असे दोन हंगाम होते.

आता यात निवडणूक हंगामाची वाढ झाली. शेती सोडून नेत्यांनी लोकांना प्रचारात लावले. दारु, पैसा व पार्टी या प्रलोभनाने शेतीपासून दूर केले. या तिसऱ्या हंगामाने घात केला. मग शेतकरी मुख्य दोन हंगामापासून दुरावला. नापिकी व कर्ज यात बुडाला. मग नेते निवडून गेले. सत्तेवर जाऊनही शेतीच्या समस्यांना बेदखल केले.

देशात सुरू असेल
निवडणुकीचा हंगाम
तुझ्या प्रश्नासाठी म्हणतील
आता गड्या तु थांब

कवीची कविता वास्तव जाणीवेला वास्तव-तेचे अंग आहे. कविता गावातील शेती, माती व शेतकरी यांच्या भावनांशी एकजीव झालेली आहे. शेतकरी यांचा भूत, भविष्य व वर्तमान हे सगळे काळ कवितेतून उजागर झाले आहेत. गाव व तेथील माणूसकी पोरकी होत चाललेली आहे. तरुण पिढी बेकारीमुळे व्यसनाधीन झालेली आहे. सांगायला घरची शेती आहे. पण पिकायला निसर्गाच्या स्वाधीन आहे. त्यामुळे परंपरागत कृषीधन त्याला मृगजळ वाटते आहे. शेती विकून नोकरीच्या मागे लागतो आहे. तेथेही येणाऱ्या अनंत अडचणी यामुळे तो त्रस्त आहे.

गावातील एकोपा,भाईचारा संपत चाललेला आहे अशी खंत लेखकाला आहे.

सणवार लग्नकार्य या निमित्ताने एकत्र येणारा तरुण आता माध्यमांच्या मृघजळात अडकलेला आहे. तेथून बाहेर निघणे त्यास अवघड जाते आहे. नवीन प्रयोग व नवीन धंदा यासाठी तो तयार नाही. त्याच्या डोक्यावर मोबाईल व माध्यमांच्या जाळ्याणी ताबा घेतला आहे. झटपट श्रीमंत होण्यासाठी नको ते करायला तो पुढे सरस-ावत आहे.

शहरीकरण, गाव व पैसा यामध्ये अडकलेला तरुणांचा तांडा आता कुठे जाईल याची याचे गणित मांडणे अवघड झाले आहे.

तरुण गावातील संस्कार सीमेच्या पलिकडे गे-लेला आहे. गावाचे जुने वैभव जाते की काय अशी भिती लेखकांनी कवितेतून उजागर केली आहे. गावधर्म पाळता आला की प्रदेश धर्म सोपा जा-तो. गावातील पिढीगत संस्कार प्रगतीच्या शिढीला चालणा देते. पण तेथील संस्कार सामर्थ्याचे दा-लणच कालबाह्य होत चालले आहे. त्यामुळे पुढच्या पिढीला प्रगतीच्या पंखात बळ देणारा गा-वाचा भुतकाळ टिकला पाहिजे अशी अशी कवीची तळमळ कवितेतून दिसून येते.संस्कार संवर्धनाची गाव रुपी केंद्रे टिकली,वाढली व संवर्धित झाली पाहिजेत. कवीची कविता गाव संस्कृतीच्या भुतकाळ मांडते. त्याचबरोबर गावाच्या वर्तमान व भविष्याचा वेध घेणारी आहे.

**कवितासंग्रह: गावपण हरवत चाललंय**
**कवी: आत्माराम राजेगोरे**
**प्रकाशन: अक्षरदान**
**मुखपृष्ठ: सरदार जाधव**
**किंमत:१००/-**
**पृष्ठे:८०**

# भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ

पुढील महिन्यात भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार असून, या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ इंग्लंड सोबत ५ कसोटीची मालिका खेळणार आहे. भारतासाठी हा दौरा खूप महत्वाचा आहे, कारण या दौऱ्यापासून भारत विश्व कसोटी चॅम्पियनशिपची सुरुवात करणार आहे. या दौऱ्यानंतर भारत ऑस्ट्रेलियाचाही दौरा करणार आहे. ऑस्ट्रेलियन दौऱ्याची पायाभरणी या दौऱ्यातून होणार आहे.

मागील इंग्लंड दौऱ्यात भारताला मानहानीकारक पराभव स्वीकारावा लागला होता त्याचे उट्टे भारत काढणार का? या प्रश्नाचे उत्तरही या दौऱ्यात मिळणार आहे. एकूणच भारतीय क्रिकेट संघ या दौऱ्याने क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात करणार आहे मात्र हा दौरा भारतासाठी वाटतो तितका सोपा नाही कारण सध्या भारतीय कसोटी संघ संक्रमनातून जात आहे. भारताचे दिग्गज आणि मॅच विनर खेळाडू असलेल्या रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटीतून नुकतीच निवृत्ती घेतली आहे. त्याआधी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना भारताचा सर्वोत्तम फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विन यानेही कसोटीतून निवृत्ती स्वीकारली होती.



रोहित, विराट आणि अश्विन हे भारताचे खेळाडू जागतिक क्रिकेटमध्ये महान खेळाडू म्हणून गणले जातात. या तिघांनी मागील दीड दशकात भारतीय क्रिकेटची धुरा आपल्या खांद्यावर यशस्वीपणे सांभाळली. या तिघांनी भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले. आज भारत कसोटीत अव्वल स्थानी आहे त्याचे श्रेय या तिघांनाच जाते. हे तिघेही भारतीय कसोटी संघाचे केवळ अविभाज्य घटकच नव्हते तर संघाचे आधारस्तंभ होते. त्यांच्या निवृत्तीने भारतीय संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ते नसल्याने बलाढ्य भारतीय संघ कुमकुवत वाटू लागला आहे.

इंग्लंड सारख्या महत्वाच्या दौऱ्यावर त्यांची अनुपस्थिती भारताला नक्कीच जाणवेल मात्र यातूनही भारतीय क्रिकेटला मार्ग काढावा लागेल. अर्थात भारतीय क्रिकेट संघावर अशी वेळ पहिल्यांदाच आली आहे असे नाही. २००० साली जेंव्हा मॅच फिक्सिंग प्रकरण उघडकीस आले तेंव्हा संघातील ज्येष्ठ खेळाडूंना घरचा रस्ता दाखवण्यात आला. संघात अनेक नवोदित खेळाडूंचा समावेश करण्यात आला. सौरभ गांगुलीकडे संघाची धुरा सोपवण्यात आली. त्याने सचिन, द्रविड, लक्ष्मणला सोबत घेऊन संघाची बांधणी केली. गांगुलीने वीरेंद्र सेहवाग, हरभजनसिंग, युवराज सिंग, जहीर खान, धोनी या युवा खेळाडूंना घेऊन संघाला उभारी दिली आणि पुढील दशकभर भारताने क्रिकेट विश्वावर अधिराज्य गाजवले. त्यानंतर २०१० ते २०१३ या कालावधीत सौरव गांगुली, राहुल द्रविड, सचिन तेंडुलकर, लक्ष्मण, वीरेंद्र सेह-वाग, अनिल कुंबळे, युवराज सिंग, हरभजन सिंग जहीर खान हे दिग्गज खेळाडू निवृत्त झाले मात्र महेंद्रसिंग धोनीने रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, शिखर धवन, जसप्रीत बुमरा या युवा खेळाडूंना हाताशी धरून संघाची बांधणी केली पुढे या संघानेही दशकभर क्रिकेटविश्वावर अधिराज्य गाजवले. आताही भारतीय संघावर तीच वेळ आली आहे. रोहित, विराट आणि अश्विनच्या निवृत्तीनंतर भारतीय संघाची नव्याने बांधणी करण्याची वेळ आली आहे.

बीसीसीआय आणि निवड समिती त्यासाठी काळजीपूर्वक पावले टाकत आहे भारतासाठी सर्वात महत्वाचा आणि मोठा प्रश्न आहे की या नव्या संघाचा कर्णधार कोण असेल ? भारतीय संघाच्या नव्या कर्णधाराच्या शर्यतीत शुभमन गिल, ऋषभ पंत आणि जसप्रीत बुमरा हे तिघे आहेत. यात बुमरा ज्येष्ठ असून त्याच्या पाठीशी मोठा अनुभव आहे मात्र बुमराची दुखापत हा चिंतेचा विषय आहे. दुखापतीमुळे तो पूर्ण मालिका खेळेल हे देखील कोणी सांगू शकत नाही त्यामुळेच त्याचा विचार कर्णधार म्हणून होईल असे वाटत नाही. ऋषभ पंत हा आता-ताई क्रिकेटर आहे. कसोटीत लागणारा संयम त्याच्याकडे नाही त्यामुळे युवा शुभमन गिल हाच भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल असे वाटते. शुभमन गिल २५ वर्षाचा आहे शिवाय त्याच्याकडे नेतृत्वगुण आहेत. आयपीएलमध्ये त्याने गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले आहे ते पाहून सर्वजण प्रभावित झाले आहेत. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची कला त्याच्याकडे आहे शिवाय प्रशिक्षक गौतम गंभीरचाही त्याच्या नावाला पाठिंबा आहे त्यामुळे तोच भारताचा नवा कर्णधार असेल अशी दाट शक्यता आहे. आता निवड समिती त्याला कसा संघ देतील हे पाहावे लागेल.

के. एल. राहुल, ऋषभ पंत आणि जसप्रीत बुमरा या अनुभवी खेळाडूंना सोबत घेऊन निवड समिती देईल त्या नवोदित खेळाडूंना घेऊन गिलला संघ बांधणी करावी लागेल. जे काम सौरभ गांगुली आणि धोन-ीने केले तेच काम शुभमन गीलला करावे लागेल. त्यात जर तो यशस्वी झाला तर तो देखील भारताचा यशस्वी कर्णधार ठरेल भारतीय कसोटी क्रिकेट संघ पूर्वीसारखा क्रिकेट विश्वावर अधिराज्य गाजवेल यात शंका नाही.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## इचार

मले येते आये
आता एकच इचार
लोकांत काऊन होत
आये बिमारीचा संचार ।।१।।

जिकडे जावा तिकडे
आता आये रोगराई
मग काऊन करत नाई
गावातली साफसफाई ।।२।।

म्हणतेत बायेरचा काई
खाल्ला त होते माणूस बिमार
मग कायले करतेत लोक
जेवणात पैशाची उधळण बेसुमार।।३।।

आये आपल्यावरच आता
निरोगी रायाची जिम्मेदारी
आपुनच आहोत आपल्या
निरोगी देहाचे अधिकारी।।४।।

**– प्रिती खोब्रागडे**
रा. गुरढा, ता. लाखनी जि. भंडारा
मो. ७२१९५१५४४८

## थोडक्यात...

### अनिकेत धुतमल यास दहावी परीक्षेत ९३ टक्के गुण

**लोहा (प्रतिनिधी)** – येथील नगर परिषदेतील कर्मचारी हरी धुतमल यांचा मुलगा अनिकेत धुतमल याने



जिद्द, मेहनत, परिश्रम व अभ्यासाच्या बळावर दहावी शालांत परीक्षेत ९३ टक्के गुण मिळविले. हरी धुतमल यांनी मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून नांदेड येथील शाळेत ठेवले. अनिकेत धुतमल याच्या यशाबद्दल डॉ. मिलिंद धनसडे, नगरसेवक पंचशील कांबळे, पत्रकार डी. एन. कांबळे, रिपाईचे सुरेश महाबळे, संतोष तोंडारे, बाळासाहेब दाढेल, भीमकीर्तिराज कलंबरकर, राहुल ढवळे, दिलीप धूतमल, सदानंद ढवळे आदींनी कौतुक केले.

### भोकरमध्ये किराणा दुकान फोडले

**नांदेड (प्रतिनिधी)**– भोकर शहरातील आरव किराणा दुकान अँड जनरल स्टोअर्स चोरट्यांनी फोडून तांदूळ, सोयाबीन तेल व अन्य सामान असा ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घरफोडी १४ मे रोजी पहाटे तीनच्या सुमारास करण्यात आली.

शहरातील दंडवे कॉलनी भागातील महेश बालाजीराव लाभसेटवार यांचे आरव किराणा दुकान आहे. त्यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद करून आपल्या घरी निघून गेले होते. अज्ञात चोरट्यांनी १४ मे रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास शटरचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला. दुकानातील तांदळाचे कट्टे, सोयाबीन तेल व अन्य साहित्य असा एकूण ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. महेश लाभसेटवार यांच्या फिर्यादीवरून भोकर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भोकर पोलीस स्टेशन मराठवाड्यात दुसऱ्या क्रमांकाने सन्मानित

## मुख्यमंत्री १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा मोहिमेत सर्वोत्कृष्ट कामगिरी

**भोकर (प्रतिनिधी)**– मुख्यमंत्री १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा विशेष मोहिमेंतर्गत पोलीस स्टेशन भोकर या कार्यालयाने सर्वांगीण सर्वोत्कृष्ट कामगिरी करत मराठवाडा विभागात द्वितीय स्थान मिळवले आहे.





१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ठ कामगिरी बजावलेली महाराष्ट्रातील तालुका स्तरीय शासकीय कार्यालय दुसरा टप्पा या उपक्रमाचा निकाल दि. १६ मे रोजी जाहीर झाला. नांदेड पोलीस दलाने केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीचा महाराष्ट्र शासनाने आढावा घेवून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली व भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या नेतृत्वाखाली विविध सर्वांगीण सर्वोत्कृष्ट उपक्रम राबविणाऱ्या भोकर पोलीस स्टेशन या कार्यालयास सर्वोत्कृष्ठ कामगिरी बद्दल छत्रपती संभाजीनगर मराठवाडा विभागातून दुसऱ्या क्रमांकाने सन्मानित करण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत नांदेड पोलीस दलांचे वेबसाईटचे अद्यावतीकरण करण्यात आले. ईज ऑफ लिव्हींगची सुरूवात करण्यात आली त्या अंतर्गत नागरीकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने पेट्रोलींगची सुरूवात करण्यात आली. त्या अनुषंगाने शहरात एकुण ७५४ व ग्रामीण भागात एकुण ७३१ ठिकाणी टी कोडस् लावण्यात आले. तक्रार निवारण कक्ष स्थापण करण्यात आले व दर शनिवारी तक्रार निवारण दिन साजरा करून आज पावेतो १ हजार ८११ तक्रारींचे निवारण करण्यात आले. नांदेड जिल्हा पोलीस दलातील सर्व कार्यालयात दर मंगळवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कार्यालयातील सर्व जुने रेकॉर्ड यांची छाननी करून आवश्यक रेकॉर्ड जतन करण्यात आले. त्याचे अ व ब रेकॉर्ड करून निर्गती केली. अभिलेख कक्षाची सफाई करून अभिलेखांची अ ब क ड पध्दतीने वर्गवारी करण्यात आली. जुन्या वाहनांचे लिलाव करण्यात आले. मुद्देमालांचा पंचनामा करून मुद्देमाल नष्ट करण्यात आले. जिल्हा पोलीस दलाच्या कार्यालयात पिण्याचे पाणी, स्वच्छता गृहांची स्वच्छता, सर्व कार्यालयात दिशा दर्शक फलक कार्यालयाचे परिसराचे सुशोभीकरण, सुसज्ज प्रतिक्षालय या सोई सुविधा करण्यात आल्या. गुंतवणुक प्रसार करण्यात आला. कोचींग क्लासेस व सर्व क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देण्यात आल्या. ऑपरेशन बिट कनेक्ट राबविण्यात आले. मिशन उडाण, ऑपरेशन वारसा जतन, नांदेड पोलीस लिग, मिशन निर्भया, मिशन समाधान, मिशन निर्धार, मिशन एकता, असे उपक्रम राबविण्यात आले.

# सी-ट्रिपल आयटी प्रशिक्षण केंद्रामुळे मुळे मराठवाड्याचा विकास होणार गतिमान

## आ. चिखलीकर यांनी मानले अजितदादांसह टाटा कंपनीचे आभार

**नांदेड (प्रतिनिधी)**– टाटा टेक्नॉलॉजी कंपनीच्या सहकार्यातून आता लवकरच बीड, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर याठिकाणी प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रिपलआयटी' प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. या सहकार्याबद्दल मी टाटा कंपनीचे आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आभार मानले आहेत .



राज्याच्या विकासात मराठवाडा नेहमीच मागास राहिला आहे. विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आतापर्यंत अनेक वेळा प्रयत्न झाले असले तरी खऱ्या अर्थाने मराठवाड्याचा विकास होऊ शकला नाही. यासाठी अनेक वेळा राजकीय अनास्थाही कारणीभूत ठरली. परंतु आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेतला आहे. त्यातूनच मराठवाड्यातील बीड, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी सी ट्रिपल आयटी केंद्र मंजूर केले आहेत. या केंद्रातून मराठवाड्याला एका विकासाच्या नव्या वाटेवर घेऊन जाण्याचा प्रयत्न होणार आहे. 'सीट्रीपलआयटी'मुळे मराठवाड्यातील युवकांना जागतिक दर्जाचं कौशल्य प्रशिक्षण, उद्योग क्षेत्राला कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यात नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची यानिमित्ताने पूर्ती होणार आहे. मराठवाड्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, 'एआय' वापरासह तांत्रिक कौशल्यविकासाची संधी मिळणार आहे. युवकांना उद्योगक्षम बनवणं, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात 'सीट्रीपलआयटी' केंद्रे महत्वाची भूमिका बजावणार आहेत, असा विश्वासही आ. चिखलीकर यांनी व्यक्त केला आहे.

# मुदखेड शहरात पावसाळ्यापूर्वी नाले सफाई

**मुदखेड (प्रतिनिधी)**– मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड नगरपरिषदेने पावसाळ्यापूर्वी आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा प्रश्नांना प्राधान्य देत नाली सफाई कामांना सुरुवात केली आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्यामुळे पाण्याचा योग्य निचरा होत नसतो. त्यामुळे शहरामधील तुंबलेल्या नाल्या किंवा झाडे झुडपे व गवतामुळे नाल्यातून पाणी सुरळीत वाहत नाही अशा ठिकाणी नाल्यांची साफसफाई नगरपरिषदेचे कामगार काम करित आहेत.



पावसाळ्यात नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये तसेच नागरीकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. याची काळजी नगर परिषदे कडून घेतली जात आहे. घन कचऱ्यामुळे किंवा कोणत्याही कारणामुळे पावसाळ्यात नाल्या भरणार नाहीत. तसेच नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी नगरपरिषद दक्षता घेत आहे. ही स्वच्छता मोहीम मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विभागाचे अभियंता सुशील खिल्लारे यांच्या अधिपत्याखाली सुनील माळी व नगरपरिषदेचे कर्मचारी काम करित आहेत.

## जिनियस किडस् इंटरनॅशनल स्कूल माहूरचा दहावीचा निकाल शंभर टक्के

**माहूर (प्रतिनिधी)** – येथील जिनियस किडस् इंटरनॅशनल स्कूलचा इयत्ता दहावी बोर्डाचा निकाल परंपरेनुसार याही वर्षी शंभर टक्के लागला आहे. तालुक्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक येण्याचा बहुमान सुद्धा शाळेस मिळाला आहे.

दहावी बोर्डाच्या या निकालानुसार या शाळेची ईश्वरी जाधव हिने ९३% गुण घेत तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. अक्षरा राठोड हिने ९२.४०% गुण घेवून द्वितीय तर तालुक्यातून तृतीय येत सत्यम चिद्दरवार याने ९१.२०%गुण घेऊन शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. इतकेच नाही तर ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण पाच विद्यार्थी आहेत.

राज्यर्षी शाहू फाऊंडेशन संचालित जिनियस किडस् इंटरनॅशनल स्कूल माहूर या शाळेने आजवर आपला १००% निकाल लागण्याच्या परंपरेला कायम ठेवले आहे. येथील अध्यापक, पालक व मेहनती विद्यार्थी यांचे हे संयुक्त यश आहे. जिनियस किडझ इंटरनॅशनल स्कूलच्या या निकालानंतर यशवंत विद्यार्थ्यांचे तालुक्यात सर्वत्र कौतूक होत आहे.

# समरसता साहित्य संमेलनाच्या माध्यमातून सेवा वस्तीवरील कार्य वाढले पाहिजे -खा. डॉ.अजित गोपछडे



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड येथे ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या विसाव्या समरसता साहित्य संमेलनाच्या माध्यमातून नांदेडमधील सेवा वस्त्यांवरील वंचित व शोषित समाज घटक सेवाकार्याशी जोडले गेले पाहिजेत. सेवा वस्त्यांवर जाऊन कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणच्या आपल्या समाज बांधवांना मदत करावी व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करावे. असे आवाहन या संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केले.

शहरातील श्रीनगर भागातील समरसता साहित्य संमेलनाच्या मध्यवर्ती कार्यालयाला भेट दिल्यानंतर सुकाणू समितीचे सदस्य व कार्यकर्त्यांशी खा. गोपछडे यांनी अनौपचारिक संवाद साधला. यावेळी नांदेडच्या समरसता साहित्य संमेलनाचे कार्यवाह माणिकराव भोसले, सेवाभारतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. संतोष देबडवार, संमेलन निमंत्रक डॉ. शिवा कांबळे, संमेलन महाव्यवस्थापक अभय कोटलवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

समरसता साहित्य संमेलनाचे कार्यवाह माणिकराव भोसले यांनी आपल्या प्रास्ताविकात मागील बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती दिली. तसेच निमंत्रक डॉ. शिवा कांबळे यांनी नांदेड जिल्ह्यांतील सर्वच साहित्यिक, सामाजिक विचारवंत या साहित्य संमेलनात सहभागी होणार आहेत. संमेलनाचे आयोजन करण्यासाठी नांदेडमधील सर्वांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

यावेळी खा. डॉ. गोपछडे म्हणाले, या समरसता साहित्य संमेलनामुळे दलित, आदिवासी, भटके-विमुक्त समाजाशी साहित्याच्या माध्यमातून संवाद साधून समरसतेचा व सामाजिक एकतेचा संदेश पोहचवला जाईल. भारतीय मूल्यव्यवस्था, राष्ट्रीय विचारधारा आणि संस्कृतीचा गौरव करणारे साहित्य निर्माण करणे व त्याचा प्रसार-प्रसार यामधून साध्य होईल. या बैठकीला संघ परिवारातील विविध आयामांचे प्रमुख कार्यकर्ते व व्यवस्थेतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड** : भारतीय सैन्य दलाचे शहीद जवान सचिन वनंजे यांच्या देगलूर येथील निवासस्थानी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी शनिवारी सांत्वनपर भेट दिली. यावेळी त्यांनी शहीद सचिन वनंजे यांना श्रद्धांजली अर्पण करून कुटुंबियांचे सांत्वन केले.

# बुद्ध जयंतीनिमित्त १९ रोजी खुरगावला विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात दरमहा पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. बुद्ध जयंतीनिमित्त उद्या १९ मे रोजी ६० श्रामणेर व भिक्खू संघाच्या उपस्थितीत सकाळपासूनच परित्राणपाठ, धम्मध्वजारोहण, त्रिरत्नवंदना, बोधीपुजा, सूत्तपठण, ध्यानसाधना, धम्मदेसना, व्याख्यान, भोजनदान, आर्थिक दान पारमिता आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रशिक्षण केंद्राचे संचालक, ऑल इंडिया भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली.



ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात बुद्ध जयंतीनिमित्त आज पौर्णिमोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुद्ध पौर्णिमा तीन कारणांसाठी विशेष आहे. हा विशेष योगायोग म्हणजे वैशाख पौर्णिमेच्या दिवशी गौतम बुद्धांचा जन्म झाला होता. याच दिवशी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि याच दिवशी बुद्धांचे महानिर्वाण झाले होते, असे सांगितले जाते. बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांत साजरी केली जाते. या निमित्त १९ मे रोजी सकाळपासूनच अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील बौद्ध उपासक उपासिका बालक बालिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# चांदोबा चंद्रे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– देगलूर तालुक्यातील कुतुबशहापूरवाडी येथील ज्येष्ठ शेतकरी चांदोबा मरीबा चंद्रे (वय ८५) यांचे १५ मे रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर गुरूवारी सायंकाळी कु.शा.वाडी येथे अंत्यसंस्कार



करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, सात मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. माजी सरपंच मारोतीराव चंद्रे यांचे बंधू तसेच सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग चंद्रे, भगवान चंद्रे व सुरेश चंद्रे यांचे ते वडील होत.

# पीएम जनमन योजनेतून आदिवासी गाव, पाड्याचा कायापालट

## ▶ योजनेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना विविध सुविधा ▶ १९३ आदिवासी लाभार्थ्यांना घरकुल मंजूर

**नांदेड (प्रतिनिधी)**– देशातील आदिम जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १५ नोव्हेंबर २०२३ पासून जनजाती आदिवासी न्याय योजना (पीएम जनमन) कार्यान्वीत करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यात किनवट व माहूर तालुक्यातील २६ कोलाम पाडयावरील आदिवासी लाभार्थ्यांना विविध उपक्रमांद्वारे लाभ देण्यात येत आहेत. यात विविध पायाभूत सुविधांचा लाभ देण्यात आला असून ही कार्यवाही निरंतर सुरु आहे.



या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुकास्तरावर समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर तालुक्यातील एकूण २६ कोलामपोडाचा/ गावांचा समावेश आहे. या २६ गावात ४६८ कुटूंबातील १ हजार ७३४ कोलाम जमातीच्या नागरिकांचे वास्तव्य आहे.

या २६ गावात तालुकास्तरीय यंत्रणेमार्फत आतापर्यत २२ शिबिरे आयोजित करण्यात आलेले आहेत. या शिबिरात योजनेसाठी आवश्यक असलेल्या सर्व दस्ताऐवजांचे वितरण करण्यात आलेले आहे. तसेच आरोग्य विभागामार्फत सिकलसेल तपासणी व आरोग्यविषयक इतर तपासण्या या कॅम्पमध्ये करण्यात आल्या आहेत. सर्व शिबिराचे आयोजनानंतर एकूण कोलाम लोकसंख्या पैकी १ हजार ६३४ लाभार्थ्याकडे आधारकार्ड, १ हजार २४९ लाभार्थ्यांना जातीचे दाखले, ४१९ कुटुंबांना रेशन कार्ड व १ हजार २४८ लाभार्थ्यांचे बँक खाते काढण्यात आलेले आहे. या शिबिराच्या माध्यमातून १ हजार २४६ लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्ड, प्रलंबित एकूण २८ फ्री वनपट्टे, १२१ पीएम किसान कार्ड लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

पीएम उज्वला अंतर्गत १४१ प्रस्ताव गॅस कनेक्शनसाठी प्राप्त होते, हे सर्व प्रस्ताव मंजूर आहेत. पीएम मातृ वंदना योजनेअंतर्गत आतापर्यत १८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. पीएम जनमन घरकुल योजनेअंतर्गत १९३ घरकुले मंजूर असून २६ गावात घरगुती विज जोडणी करण्यात आलेली आहे. सर्व गावांमध्ये मोबाईल कनेक्टीव्हिटी बाबत पाठपुरावा करण्यात आलेला असून, सर्व गावात मोबाईल कनेक्टीव्हिटी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. पीएम जनमन अंतर्गत जावरला येथे अंगणवाडीचे काम मंजूर असून हे काम प्रगतीपथावर आहे.

सर्व कोलामवस्ती, गावामध्ये वैद्यकीय सेवा उपलब्ध असून २५ गावांमध्ये नियमित मोबाईल मेडिकल युनिट द्वारे नियमित भेट देण्यात येते. आरोग्यविषयक सेवा पुरविण्यात येतात. सर्व गावांमध्ये घरगुती नळ पाणीपुरवठा योजनेचा लाभ मंजूर केला आहे. सर्व कोलाम वास्तव्य असलेल्या गावात आवश्यक सेवांचा पुरवठा पीएम जनमन योजनेअंतर्गत करण्यात आलेला आहे, अशी माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला यांनी दिली आहे.

# परिवर्तनवादी तत्व प्रणालीला केंद्रबिंदू मानून बहुजनांना जोडावे -कामाजी पवार



**नांदेड (प्रतिनिधी)**– आंबेडकरवादी विचारांच्या परिवर्तनीय तत्व प्रणाली हीच देशाला तारू शकते. त्यामुळे परिवर्तनाच्या ह्या विचारधारेस केंद्र बिंदू मानून बहुजनांना जोडण्याचे कार्य करावे, असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांनी अध्यक्षपदावरून बोलताना केले.

या प्रसंगी भंते पय्याँबोधी, कुणाल कांबळे, डॉ. यशवंत चव्हाण, उत्तम सोनकांबळे, शिवाजी सोनकांबळे, ॲड. शिवराज कोळीकर, दैवशील गवंदे, डॉ. भास्कर दवणे, मधुकर गच्चे आदी मान्यवर उपस्थित होते.

आंबेडकरवादी मिशन हे वैचारिक विचारांची देवाण घेवाणीचे महत्त्वाचे केंद्र आहे, असे डॉ. यशवंत चव्हाण यांनी स्पष्ट केले. सामाजिक जीवनात कार्य करताना स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेऊन तत्वाला प्राधान्य देणे काळाची गरज आहे, असे आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम प्रमुख यांनी स्पष्ट केले.

# चंदेरी

## बॉलीवूडच्या या प्रसिद्ध अभिनेत्यांचा बलुचिस्तानशी संबंध..!

**सध्या पाकिस्तानमधील बलुचिस्तान हा प्रांत मोठ्या चर्चेत आहे. बलुचिस्तान पाकिस्तानपासून वेगळे होण्याची मागणी करीत आहे. एकेकाळी बलुचिस्तान हा भारताचा भाग होता. १९४७ ला जेव्हा भारताची फाळणी झाली. त्यावेळी बलुचिस्तानमधील अनेक नागरिक भारतात आले. तुम्हाला माहित आहे का बॉलीवूडमधील अनेक दिग्गज कलाकार हे बलुचिस्तानमध्ये जन्मलेले आहेत. कादर खान, राजकुमार, अमजद खान आणि सुरेश ओबेरॉय या कलाकारांचा पाकिस्तानातील बलुचिस्तान प्रांताशी संबंध आहे.**




प्रसिद्ध अभिनेते कादर खान यांचा जन्म बलुचिस्तानमधील पिशीन येथे झाला. त्यांनी त्यांचे बालपण बहुतेक काळ त्यांच्या आईबरोबर पिशिनमध्ये घालवले. कालांतराने त्यांचे वडील व्यवसायासाठी कुटुंबासह मुंबईत आले. राजकुमार हे भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते होते. कुलभूषण पंडीत असेही त्यांचे नाव आहे. 'अपने पैर जमीन पर मत रखिएँगा, मैले हो जाएँगे' हा त्यांचा डायलॉग मोठ्या प्रमाणात गाजला होता. 'तिरंगा', 'सौदागर', 'मदर इंडिया', असे त्यांचे अनेक चित्रपट गाजले. त्यांचा जन्म ८ ऑक्टोबर १९२६ रोजी बलुचिस्तानमधील लोरालाई येथे झाला होता. नंतर ते मुंबईत आले. बॉलीवूडमध्ये काम करण्यापूर्वी ते मुंबई पोलिसात उपनिरीक्षक म्हणून काम करत होते. भारतीय चित्रपटसृष्टीतील अनेक सिनेमे प्रचंड गाजले. त्यामध्ये शोले हा एक सिनेमा आहे. कितने आदमी थे हा डायलॉग आजही लोकांच्या तोंडी असतो. या चित्रपटात गब्बर ही भूमिका अमजद खान यांनी साकारली होती. अजमद खान यांची गब्बर ही भूमिका प्रचंड गाजली. अजमद खान यांचा जन्म १२ नोव्हेंबर १९४० ला बलुचिस्तानमधील क्वेट्टा येथे झाला होता. इतकेच नाही तर सुरेश ओबेरॉय यांचा जन्मदेखील बलुचिस्तानमधील क्वेटा येथे झाला आहे. तसेच, हिना चित्रपटातील प्रसिद्ध नायिका झेबा बख्तियार यादेखील बलुचिस्तानमधील आहेत.





## बॉलीवूडच्या स्थितीला कलाकारांची अयोग्य निवडच जबाबदार !

**सध्या बॉलीवूड एका बिकट अवस्थेतून जात आहे. बोटावर मोजण्याइतके चित्रपट बॉक्स ऑफीसवर हिट ठरत आहेत. मोठमोठ्या कलाकारांच्या चित्रपटांना बघायला जायला कुणी तयार नाही. या स्थितीला नक्की काय आणि कोण जबाबदार आहे, याची चर्चा सध्या बॉलीवूडमध्ये होत असते. त्यावर बॉलिवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी याने आपले परखड मत व्यक्त केले असून, त्याच्या मते, भूमिकेला न्याय देऊ शकेल, अशा कलाकारांची निवडच होत नाही. कलाकारही कलाकृतीवर कठोर परिश्रम करतच नाहीत, असे तो म्हणाला. मुलाखत वाचूया प्रश्नोत्तराच्या स्वरुपात...**

- **प्रश्न : आजकाल, आपण चित्रपट उद्योगात एआयबद्दल चर्चा ऐकत आहोत की हळूहळू त्यापासून चित्रपट देखील बनवले जातील. एआय बद्दल तुमचे काय मत आहे ?**
- **नवाजुद्दीन :** बघा, एआयने सर्व काही करता येते पण काहीही निर्माण करता येत नाही. जर तुम्ही एआय मध्ये काहीतरी ठेवले तर ते त्यावर आधारित काहीतरी तयार करेल. पण तेही पूर्णपणे खरे ठरणार नाही. पटकथा लिहिताना भावना आणि सर्जनशीलतेसाठी, एका पुरूषाला दुसऱ्या पुरूषाशी बोलावे लागेल. आता जर तुम्ही काहीतरी लिहिलं आणि कल्पना मागितली तर तुम्हाला एक कल्पना मिळेल जी आधीच अस्तित्वात आहे.
- **प्रश्न : सध्याच्या चित्रपटसृष्टीच्या स्थितीत कधी मोठ्या स्टार्सचे चित्रपट फ्लॉप होत आहेत तर कधी नवीन कलाकारांचे चित्रपटही चांगले चालत आहेत. हिंदी चित्रपट उद्योग चांगले प्रदर्शन का करू शकत नाही ? हिंदी चित्रपटसृष्टीत कथांची कमतरता आहे की आणखी काही कारण आहे ?**
- **नवाजुद्दीन :** मला वाटतं याची अनेक कारणे आहेत. पण एक अभिनेता म्हणून मला वाटते, की चित्रपटाला न्याय देणाऱ्या कलाकारांची योग्य निवड होत नाही. समस्या अशी आहे की स्टार्समध्ये अभिनयाची खूप कमतरता आहे. जर मी सत्या चित्रपटातील मनोज वाजपेयींची भूमिका एका सामान्य अभिनेत्याला दिली तर ती प्रभावी होणार नाही. इतके सुंदर लेखन आणि संवाद लिहिले गेले आहेत की, योग्य अभिनय करण्यासाठी प्रतिभावान कलाकारांची आवश्यकता आहे. मला वाटतं इथे सर्वात मोठी कमजोरी म्हणजे तुम्ही योग्य कलाकारांची निवड करत नाही. आपल्या देशात खूप चांगले कलाकार आहेत पण त्यांना संधी मिळत नाही. जर तुम्ही एका चांगल्या अभिनेत्याला आणि एका सामान्य अभिनेत्याला समान संवाद दिले तर दोघांच्याही अभिनयात खूप फरक असेल.
- **प्रश्न : थिएटरची अवस्थाही खूप वाईट आहे. तुम्ही रंगभूमीवरून आला आहात, मग परिस्थिती सुधारण्याबद्दल तुमचे काय मत आहे ?**
- **नवाजुद्दीन :** थिएटरची स्थिती आता सुधारत आहे. मुले मोबाईल आणि स्क्रीनमध्ये व्यस्त असल्याने लोक त्यांच्या मुलांना थिएटरमध्ये आणत आहेत. पालकांना माहीत असते की त्यांच्या मुलाचे मोबाईलमुळे नुकसान होतेय. त्यामुळे लोक त्यांच्या मुलांना लाईव्ह परफॉर्मन्स पाहण्यासाठी घेऊन जात आहेत. नाहीतर, आजकाल सगळं पडद्यावर आहे. आता कलाकारांसोबतही असे घडते की त्यांच्याकडे भरपूर माहिती असते पण ते त्यांच्या कलाकृतीवर कठोर परिश्रम करतच नाहीत. ते त्यांच्या मोकळ्या वेळेत सराव करत नाहीत. तुमच्या मोकळ्या वेळेत तुमच्या अभिनयावर लक्ष केंद्रित करा, फक्त आवश्यक असलेली माहिती ठेवा. संपूर्ण जगाच्या सर्व माहितीचा ठेका कोणीही घेतलेला नाही. आधी तुमचे काम जाणून घ्या, असा सल्ला मी कलाकारांना देऊ इच्छितो.
- **प्रश्न : फोन तुमच्यासाठीही एक व्यसन बनला आहे का ?**
- **नवाजुद्दीन :** आजपर्यंत कोणीही मला सेटवर हातात फोन घेऊन पाहिलेले नाही. मी फोनचा गुलाम होणार नाही. पण त्याला माझा गुलाम बनवेन. जगात काय चालले आहे हे मला का जाणून घ्यायचे आहे, पण आधी मला माझ्या आत काय चालले आहे ते कळायला हवे.
- **प्रश्न : चित्रपट साइन करताना तुम्ही कोणत्या गोष्टींकडे लक्ष देता ?**
- **नवाजुद्दीन :** मी चित्रपटातील पात्रांवर सर्वाधिक लक्ष केंद्रित करतो. मला अशा पात्रांमध्ये रस नाही जे खूप चांगले माणसे आहेत आणि ज्यांच्यात कोणतीही कमतरता नाही. जरी माझ्यात नायकाचे पात्र असले तरी, त्याच्यात काही दोष असले पाहिजेत. असे नाही की नायक एखाद्या अज्ञात जगातून आला आहे की त्याच्यात काही कमतरता नाहीत. मला अशी पात्रे साकारणे निरर्थक वाटते.



## काजल अग्रवाल यशची पत्नी होईल का ? 'रामायण' मध्ये मिळाली मंदोदरीची भूमिका



नितेश तिवारी यांच्या आगामी रामायण चित्रपटाची सर्वांनाच उत्सुकता आहे. सध्या या चित्रपटाबाबत एकामागून एक मोठे अपडेट्स समोर येत आहेत. रणबीर कपूर आणि साई पल्लवी भगवान राम आणि माता सीतेच्या भूमिकेत दिसणार आहेत. आता असे सांगितले जात आहे की या चित्रपटात काजल अग्रवालदेखील असेल, जी यशच्या पत्नीच्या भूमिकेत दिसणार आहे.

काजल ही मंदोदरीची भूमिका साकारताना दिसणार आहे, तर यश रावणाची भूमिका साकारणार आहे. काजलने चित्रपटाचे शूटिंग सुरू केले आहे. रामायणात मंदोदरीची भूमिका निश्चितच खूप महत्त्वाची आहे. म्हणूनच, निर्मात्यांना यशच्या विरुद्ध रावणाच्या पत्नीची भूमिका साकारू शकेल अशा सक्षम अभिनेत्रीला निवडणे महत्त्वाचे होते. निर्मितीशी संबंधित एका सूत्राने सांगितले की, रामायणासाठी निर्माते अशा अभिनेत्रीच्या शोधात होते जिचे सर्व भाषांवर चांगले प्रभुत्व आहे. अनेक बॉलिवूड अभिनेत्रींची नावे विचारात घेण्यात आली होती परंतु काजल अग्रवालला उत्तर आणि दक्षिण दोन्ही देशांमध्ये लोकप्रियतेमुळे अंतिम रूप देण्यात आले.

रामायण चित्रपटाबद्दल बोलायचे झाले तर, सनी देओल, रवी दुबे, अरुण गोविल आणि लारा दत्ता हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. हा चित्रपट दोन भागांत प्रदर्शित होणार आहे, पहिला भाग २०२६ च्या दिवाळीला आणि दुसरा भाग २०२७ मध्ये प्रदर्शित होईल.

### अभिनेत्री वामिका गब्बीची विशेष मुलाखत

## आयुष्य काहीही असो, वडीलच माझे सुपरस्टार

**हिंदी आणि पंजाबी चित्रपटांमध्ये नाव कमावलेली सुंदर अभिनेत्री वामिका गब्बी ही बेबी जॉन आणि ८३ सारख्या चित्रपटांमध्ये दिसली आहे. सध्या तो तिच्या 'भूलचूक माफ' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती राजकुमार रावसोबत दिसत आहे. वामिकाने विशेष मुलाखतीत तिच्या करिअरसह अनेक विषयांवर चर्चा केली...**






- **प्रश्न : तू बॉलीवूड इंडस्ट्रीत बराच काळ घालवला आहे आणि आता तुला चांगल्या संधीही मिळत आहेत. आतापर्यंतच्या प्रवासाकडे तू कशी पाहते ?**
- **वामिका :** माझ्या पालकांच्या पाठिंब्यामुळेच मी इतके दिवस इंडस्ट्रीत आहे. माझे काही मित्र आहेत जे माझ्या पाठीशी उभे राहतात. यामुळे मी माझ्या प्रवासात कधीही निराश झाले नाही. मला वाटलं नव्हतं की मला कधी भूल चूक माफ सारखा चित्रपट मिळेल. पूर्वी मला वाटायचे की जर मी एखाद्या सुपरस्टारच्या घरी जन्मले असते तर आयुष्य खूप चांगले असते. आता मी देवाचे आभार मानते की माझे आयुष्य काहीही असो, माझे वडीलच माझे सुपरस्टार आहे.
- **प्रश्न : दिल्लीला आल्यावर तुझा अनुभव कसा असतो ?**
- **वामिका :** मी दिल्लीपासून फक्त तीन तासांच्या अंतरावर राहते. माझा पहिला चित्रपटही दिल्लीत चित्रित झाला होता. मी दिल्लीतील पहाडगंज भागात दीड महिना राहिले. आम्ही इथे दोन दिवसांसाठी आलो आहोत. त्यामुळे कामावरून सुटल्यानंतर बाहेर काहीतरी खाण्यास मी खूप उत्सुक आहे. मी चाट खाईन आणि काहीतरी गोड पण खाईन.
- **प्रश्न : येणाऱ्या काळात तुझे कोणते चित्रपट येणार आहेत ?**
- **वामिका :** मी एक तमिळ आणि एक तेलुगू चित्रपट केला आहे. जिनी नावाचा एक चित्रपट आहे. दुसरा चित्रपट म्हणजे दिल का दरवाजा खोल ना डार्लिंग.
- **प्रश्न : तुमच्या नवीन चित्रपटात असे दाखवले आहे की तुमचे कुटुंब तुमच्यासाठी सरकारी नोकरी असलेला मुलगा शोधत आहे. तुम्ही कधी तुमच्या आजूबाजूला पाहिले आहे का की लोक म्हणतात की सरकारी नोकरी असलेला मुलगा हवा आहे ?**
- **वामिका :** मला वाटतं ते सगळीकडे आहे. सरकारी नोकरी ही एक प्रकारची सुरक्षितता आहे, ज्यामध्ये पेन्शन आणि इतर सुविधा देखील असतात. पूर्वी हे खूप व्हायचे पण आज तेवढे होत नाही. हो, आजही लहान शहरांमध्ये याला खूप महत्त्व दिले जाते.
- **प्रश्न : आज राजकुमार हा इंडस्ट्रीचा राजकुमार आहे आणि त्याने अनेक चांगले चित्रपट केले आहेत. राजकुमारसोबत काम करण्याचा तुमचा अनुभव कसा होता ?**
- **वामिका :** राजकुमारसोबत काम करण्याचा माझा अनुभव खूप चांगला आहे. त्याच्यासोबत काम करायला मला आनंद झाला. माझे आईवडील खूप आनंदी होते की मी राजकुमारसोबत चित्रपट करत आहे. मी थोडा घाबरली होती पण राजकुमार आणि दिग्दर्शक करण शर्मा यांनी मला खूप आधार दिला. यामुळेच मी माझे सर्वोत्तम सादरीकरण करू शकले. शूटिंगचे वातावरण खूप चांगले होते.

# सोडचिठ्ठी

## कार्तिक आर्यनची 'दोस्ताना २'ला

**करण जोहर हा बॉलीवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शक व निर्माता आहे. त्याने आजवर अनेक सुपरहिट चित्रपटांचं दिग्दर्शन व निर्मिती केली आहे. 'दोस्ताना' हा चित्रपट त्यापैकीच एक. 'दोस्ताना' चित्रपटात अभिनेत्री प्रियांका चोप्रा, अभिषेक बच्चन, जॉन अब्राहम हे कलाकार मुख्य भूमिकेत झळकले होते. करण जोहरची निर्मिती असलेला हा चित्रपट २००८ साली प्रदर्शित झाला होता. त्याकाळी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई केली होती. या चित्रपटातील गाणी त्याकाळी बरीच गाजली होती.**



'दोस्ताना' चित्रपटाला प्रदर्शित होऊन एक दशकाहून अधिक काळ लोटला, तर गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाच्या पुढच्या भागाची चर्चा सुरू आहे. यापूर्वी या चित्रपटामध्ये अभिनेता कार्तिक आर्यन व जान्हवी कपूर झळकणार असल्याचं म्हटलं गेलं. परंतु, करण जोहरबरोबरच्या वैचारिक मतभेदामुळे कार्तिकने या चित्रपटात काम न करण्याचा निर्णय घेतला होता. अशातच आता या संदर्भातील नवीन माहिती समोर आली आहे. 'दोस्ताना २' मध्ये अभिनेता विक्रांत मॅसी झळकणार अशी चर्चा सुरू आहे. 'दोस्ताना २'मध्ये विक्रांत मॅसी कार्तिक आर्यनची रिप्लेसमेंट करणार असल्याचं म्हटलं जात आहे, तर जान्हवी कपूरच्या जागी कोणती अभिनेत्री झळकणार हे अद्याप समोर आलेलं नाही. करण जोहरची 'धर्मा' ही निर्मिती संस्था या चित्रपटाचं काम पाहत आहे; तर या चित्रपटात विक्रांत मॅसी व अभिनेता लक्ष्य लालवाणी पाहायला मिळणार असून या चित्रपटातील मुख्य नायिकेसाठी नवीन चेहऱ्याला पसंती दिली जाणार आहे. तर पुढच्या वर्षी जानेवारी २०२६ मध्ये चित्रपटगृहात हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. दरम्यान, विक्रांत मॅसीच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर काही दिवसांपूर्वीच त्याने तो अभिनय क्षेत्र सोडणार असल्याचं म्हटलं होतं. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत कौटुंबिक कारणासाठी तो हे करत असल्याचं त्यानं म्हटलं होतं. परंतु, सध्या तो श्री श्री रविशंकर यांच्यावर आधारित चरित्रपटाच्या चित्रीकरणामध्ये व्यस्त आहे. यानंतर तो 'डॉन ३' मध्येही झळकणार आहे.

## दिलजीत दोसांझची 'नो एंट्री २'ला

**बोनी कपूर यांच्या बहुप्रतीक्षित ड्रीम प्रोजेक्ट 'नो एंट्री'च्या सीक्वेलबद्दल काही काळापासून बरीच चर्चा आहे. अनीस बज्मी दिग्दर्शित या चित्रपटासाठी वरुण धवन, अर्जुन कपूर व दिलजीत दोसांझ यांची नावे पुढे आली होती; परंतु आता बातमी येत आहे की, दिलजीत या प्रोजेक्टमधून बाहेर पडला आहे.**

दिलजीत दोसांझचे चाहते त्याला 'नो एंट्री २' या कॉमेडी चित्रपटात पाहण्यासाठी खूप उत्सुक होते; पण आता त्याचे चाहते निराश झाले आहेत. कारण- गायक व अभिनेता दोसांझ या प्रोजेक्टमधून बाहेर पडत आहे. दिलजीत दोसांझने 'नो एंट्री २'पासून स्वतःला दूर केले आहे. असे म्हटले जात आहे की, तो या प्रोजेक्टबद्दल खूप उत्साहित होता आणि वरुण धवन-अर्जुन कपूरबरोबर काम करण्यासही तो आनंदी होता; परंतु चित्रपटाच्या क्रिएटिव्ह कल्पनेबद्दल त्याचे मत वेगळे होते. त्यामुळे क्रिएटिव्ह मतभेदांमुळे त्याने चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलजीत आणि चित्रपटाच्या टीममध्ये स्क्रिप्टबाबत अनेक वेळा चर्चा झाली; परंतु तो चित्रपटाच्या कंटेंटवर खूश नव्हता. असेही म्हटले जात आहे की,



त्याला त्याचे पात्र मजबूत आणि स्क्रिप्ट चांगली हवी होती. परंतु, ते शक्य झाले नाही, तेव्हा त्याने चित्रपटाला निरोप देणेच योग्य मानले. आता सर्वांत मोठा प्रश्न असा निर्माण होतो की, दिलजीत गेल्यानंतर चित्रपटात त्याची जागा कोण घेईल. चित्रपटाचे निर्माते बोनी कपूर व दिग्दर्शक अनिस बज्मी यांनी अद्याप यावर कोणतेही अधिकृत विधान केलेले नसले तरी लवकरच त्याच्या जागी एखाद्या मोठ्या कलाकाराला साइन केले जाईल, असे मानले जाते. दिलजीत आणि वरुण 'नो एंट्री २'मध्ये एकत्र दिसणार नसले तरी हे दोन्ही कलाकार सनी देओलबरोबर 'बॉर्डर २'मध्ये काम करीत आहेत. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये खूप उत्साह आहे आणि असे मानले जाते की, हा वॉर ड्रामा मोठ्या पातळीवर बनवला जात आहे.

# पाकिस्तानला मदत करणाऱ्या १३ जणांना अटक

## सहा यू-ट्युबर आणि सात ओटीपी घोटाळेबाज

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पाकिस्तानला मदत करणाऱ्या तेरा जणांना देशाच्या विविध भागांतून अटक करण्यात आली आहे. यात सहा यू ट्युबर आणि सात ओटीपी घोटाळेबाज यांचा समावेश आहे. अटक केलेले यू ट्युबर पाकिस्तानसाठी हेरगिरी करत होते. यात ट्रॅव्हल व्लॉगर ज्योती आणि गुजाला, यामीन मोहम्मद, देविंदर सिंग ढिल्लन, अरमान यांचा समावेश आहे. यू ट्युब व्हिडीओ तयार करण्याच्या निमित्ताने फिरताना देशातले सहा यू ट्युबर पाकिस्तानसाठी हेरगिरी करत होते. या प्रकरणात ज्योतीला अधिकृत गुप्तता कायदा आणि भारत न्याय संहिता कलम १५२ अंतर्गत अटक करण्यात आली आहे. इतर यू ट्युबरनाही हेरगिरी प्रकरणी अटक करण्यात आली आहे. तर आसाम पोलिसांनी ओटीपी शेअर करून पाकिस्तानातील लोकांना भारतीय नंबरवरून व्हॉट्सअॅप वापरण्यास मदत करणाऱ्या ७ जणांना अटक केली.

गजराज मिलिटरी इंटेलिजेंसकडून माहिती मिळाली की त्यांना असे अनेक लोक सापडले आहेत जे भारतीय व्हॉट्सअॅप नंबर वापरून अकाउंट तयार करण्यासाठी पाकिस्तानातील लोकांना ओटीपी पाठवत होते. गेल्या अनेक दिवसांपासून तांत्रिक विश्लेषण केले जात होते आणि १४ तारखेला एसटीएफमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. यानंतर ऑपरेशन घोस्ट सिम सुरू करण्यात आले. कारवाईचा एक भाग म्हणून, राजस्थानातील हैदराबाद येथे पथके पाठवण्यात आली. आणि १६ तारखेच्या दुपारपासून सात जणांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेले सर्वजण ओटीपी शेअर करत होते. यातून एक देशासाठी धोकादायक असा गुन्हा घडत होता; असे पोलिसांनी सांगितले. पाकिस्तानी देशविरोधी कारवायांसाठी जे व्हॉट्सअॅप अकाउंट वापरत होते ते भारतीय आहे, असा भारतीय तपास पथकांचा समज होत होता. यामुळे पाकिस्तानींना देशविरोधी कारवाया करुनही प्रदीर्घ काळ सुरक्षित राहणे आणि स्वतःची खरी ओळख लपवणे शक्य झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

# न्यायाधीशांच्या घरावर चोरट्यांचा डल्ला; धाडसी चोरीत २० तोळे सोन्यासह लाखोंचा ऐवज लंपास

**मुंबई (प्रतिनिधी)** – बार्शी तालुक्यातील पाथरी गावात धाडसी चोरीची घटना घडली असून चक्क न्यायाधीश महोदयांच्या घरीच चोरट्याने डल्ला घातला आहे. मध्यरात्री १.३० वाजताच्या सुमारास चोरट्यांनी घराच्या किचनच्या दरवाजाचं कुलूप तोडून घरातील ज्वारीच्या कोट्यातून जवळपास २० तोळे सोने आणि ५ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. न्यायाधीश हे देवदर्शनासाठी कोल्हापूरला गेले असता ही घटना घडली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून आरोपीचा शोध सुरू आहे.



पुढे आलेल्या माहितीनुसार, पाथरी येथील दिनेश गायकवाड हे सध्या वाशिम तालुक्यातील रिसोड येथे न्यायदंडाधिकारी असून सुट्टीनिमित्ताने ते गावी आले होते. त्यातच, धार्मिक कार्यक्रमनिमित्ताने ते कोल्हापूरला दर्शनासाठी गेले असता, त्यांच्या घरात चोरीची घटना घडली. याबाबत, त्यांच्या आई पद्मिनी मुकुंद गायकवाड यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने अंदाजे किंमत १२ लाख २३ हजार रुपये आणि ५ हजार रोकड लंपास केल्याचे नमूद केले आहे.

दाखल तक्रारीनुसार, आमचे घरी धार्मिक कार्यक्रम असल्याने मुलगा, सुन व नातवंडे घरी पाथरी येथे आले होते. तसेच मुलगी रेश्मा तिच्या मुलांसह कार्यक्रमासाठी आली असून ती सध्या आमच्याकडेच राहण्यास आहे. धार्मिक कार्यक्रम झाल्यानंतर दिनांक १५ मे रोजी रोजी मुलगा, सुन व नातवंडे असे देवदर्शनासाठी कोल्हापूर येथे गेले आहेत. काल दिनांक १६ मे रोजी रात्री १० वाजता मी आणि मुलगी रेश्मा, नातवंडे असे जेवण वगैरे करून घराच्या हॉलमध्ये झोपलो होतो. हॉल व किचन-बेडरूममध्ये रिकामा पोर्च असल्याने किचनला बाहेरून कुलूप लावून नेहमी झोपतो. काल देखील आम्ही जेवण झाल्यानंतर किचनला बाहेरून कुलूप लावून झोपलो होतो. आज रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास मी झोपेतून उठून हॉलचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला असता बाहेरून कडी लावल्याचे दिसून आले. त्यामुळे मी खिडकीतून बाहेर पाहिले असता किचन रुमचे कुलूप लावलेले नव्हते व दरवाजा उघडा दिसला. मुळे मी माझी जाऊ-कमल केशव गायकवाड यांना फोन करून हॉलची बाहेरून लावलेली कडी काढण्यास सांगितली. त्यांनी येवून कडी उघडली असता आम्ही बाहेर येवून पाहिले असता किचन रुमचे कुलूप लावलेले दिसून आले नाही. दरवाजा उघडा असल्याने आम्ही किचन व बेडरुममध्ये जाऊन पाहिले असता बेडरुममधील फर्निचर कपाटातील कपडे व इतर साहित्य बाहेर काढून विस्कटून टाकलेले दिसून आले. तसेच धान्याचे कोठयाचे टोपणे काढून धान्य विस्कटलेले होते. माझी पर्स उचकटलेली होती. त्यामध्ये मी ठेवलेले पाच हजार रुपये व गळ्यातील मण्याची पोत दिसून आली नाही.

# कोट्यवधी रुपयांच्या अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या महिलेला अटक

**मुंबई (प्रतिनिधी)** – पालघर जिल्ह्यातील तुळींज पोलीस ठाण्याने मोठी कारवाई केली. पोलिसांनी नालासोपारा पूर्वेतील प्रगती नगर येथील एका निवासी इमारतीमधील अमली पदार्थांवर प्रक्रिया करणाऱ्या बेकायदा कारखान्यावर धाड टाकली. या कारवाईत रीटा फती कुरेबेवेई नावाच्या नायजेरियन महिलेला अटक करण्यात आली. पोलिसांनी एमडी अर्थात मेफेड्रोन नावाच्या अमली पदार्थाचा साठा जप्त केला. जप्त केलेल्या एमडीची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत पाच कोटी साठ लाख चाळीस हजार १५० रुपये एवढी आहे.

खबऱ्यांनी दिलेल्या माहितीआधारे पोलिसांनी अंशित प्लाझातील एका सदनिकेवर (फ्लॅट) धाड टाकून कारवाई केली. सदनिकेत एमडीवर प्रक्रिया करण्यासाठी आधुनिक यंत्रणा सज्ज होती. पोलिसांनी एमडीचा साठा तसेच एमडीवर प्रक्रिया करण्याची यंत्रणा या दोन्हीची जप्ती केली आणि महिलेला अटक केली. अटक केलेल्या महिलेविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत कारवाई सुरू आहे. पोलीस याच प्रकरणात हेन्रीउचेन्ना उवाक्वेचाही शोध घेत आहे.

रीटा फती कुरेबेवेईकडे भारतात राहण्यासाठी आवश्यक असलेली वैध कागदपत्रेच नव्हती. यामुळे रीटा फती कुरेबेवेईविरुद्ध भारतात घुसखोरी करुन बेकायदा कृत्य केल्याचा आणखी एक आरोप ठेवण्यात आला आहे. ही कारवाई केल्यानंतर संपूर्ण ठाणे आणि पालघर जिल्ह्यात परदेशातून आलेल्या प्रत्येक नागरिकाच्या कागदपत्रांची बारकाईने छाननी करण्याचे निर्देश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# दहशतवादी हल्ल्याच्या शक्यतेने पुण्यात 'हाय अलर्ट'

**पुणे (प्रतिनिधी)**– भारत आणि पाकिस्तानमध्ये ऑपरेशन सिंदूरनंतर तणाव वाढला होता. शस्त्रसंधीमुळे तणाव कमी झाला असला तरी पाकिस्तान किंवा दहशतवाद्यांकडून हल्ल्याची शक्यता नाकारता येत नाही. याच पार्श्वभूमीवर पुणे शहरात हाय अलर्ट घोषित करण्यात आला आहे. भारतीय सैन्याच्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर दहशतवादी संघटनांकडून संभाव्य हल्ल्याचा धोका लक्षात घेता पुणे पोलिसांनी सुरक्षा उपाययोजनांची कडक अंमलबजावणी सुरू केली आहे.

दहशतवादी हल्ल्याच्या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी पुणे शहरात १२ जून २०२५ पर्यंत काही हवाई उपकरणांच्या वापरावर बंदी घातली आहे. यात ड्रोन, रिमोट कंट्रोल एअरक्राफ्ट, मायकोलाइट विमान, पॅराग्लायडर, पॅरामोटर, हॅण्डग्लायडर, हॉट एअर बलून इत्यादी उपकरणांचा समावेश आहे. पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी या संदर्भात आदेश जारी केले आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने ही बंदी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य वाहतुकीवर कारवाई; ६३.९८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**मुंबई (प्रतिनिधी)**– ठाणे येथील राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक यांच्या भरारी पथकाने परराज्यातील भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य (गोवा राज्यात निर्मित) वाहतुकीवर अमित गार्डनजवळ, मुंब्रा रोड, मुंब्रा, ता. जि. ठाणे येथे १६ मे २०२५ रोजी कारवाई केली. टेम्पो क्र. एम एच ०५ एएम १२६५ या वाहनावर संशय आल्याने वाहनावर छापा घालून गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यामध्ये परराज्यातील भारतीय बनावट विदेशी मद्याच्या (गोवा राज्यात निर्मित) एकूण ८०० बॉक्स दारूबंदी गुन्ह्याअंतर्गत जप्त केले आहे. तसेच वाहनासह एकूण ६३ लाख ९८ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी वाहनचालक नामे



जुल्फेकार ताजअली चौधरी यास अटक केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ.राजेश देशमुख आयुक्त, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदिप पवार, अधीक्षक प्रविण तांबे, उपअधीक्षक वैद्य, श्री.पोकळे, ए.डी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईमध्ये निरीक्षक एम.पी.धनशेट्टी, दुय्यम निरीक्षक एन.आर.महाले, आर.के.लब्दे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक बी.जी.थोरात, जवान पी.ए.महाजन, श्रीमती एस.एस.यादव, एम.जी. शेख आदींचा सहभाग होता. या गुन्ह्याचा पुढील तपास अधिक्षक प्रविण तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक महेश प्रकाश धनशेट्टी हे करीत आहेत.

# मुंबई विमानतळ आणि हॉटेल ताज महल बॉम्बने उडवून देण्याची धमकी

**मुंबई (प्रतिनिधी)** – छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि ताज महल पॅलेस हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई मेल मुंबई पोलिसांना प्राप्त झाला आहे. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. हा ई मेल मिळाल्यापासून मुंबई पोलीस दल हाय अलर्टवर आहे. पोलिसांनी धमकीचा ई मेल करणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध सुरू केला आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि ताज महल पॅलेस हॉटेल बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई मेलद्वारे देण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर तीन - चार दिवसांत बॉम्बस्फोट होणार अशी धमकी ई मेलद्वारे देण्यात आली आहे. हा धमकीचा ई मेल मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन विभागाला प्राप्त झाला. पाठोपाठ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि ताज महल पॅलेस हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई मेल मुंबई पोलिसांना प्राप्त झाला आहे. सायबर पोलीस दोन्ही ई मेल प्रकरणी तपास करत आहेत. अद्याप कुठेही स्फोट झालेला नाही. पोलिसांनी दोन्ही ई मेलचा सेंडर शोधण्याचे प्रयतन सुरू केले आहेत.

# 'आयएसआयएस'शी संबंधित दोघांना अटक

**मुंबई (प्रतिनिधी)** – एनआयएने पुण्यातील २०२३ च्या आयईडी प्रकरणात दोन फरार आरोपींना मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक केली. हे दोघेही बंदी घातलेल्या आयएसआयएस या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेच्या स्लीपर मॉडेलचे सदस्य आहेत. अब्दुल्ला फैयाज शेख उर्फ डायपरवाला आणि तल्हा खान अशी अटक केलेल्या दोघांची नावं आहेत. अटक केलेले दोघे इंडोनेशियातील जकार्तात अनेक महिन्यांपासून लपले होते. तिथून भारतात परतताच त्यांना विमानतळावरून अटक करण्यात आली.

काही महिन्यांपूर्वीच एनआयएने अब्दुल्ला फैयाज शेख उर्फ डायपरवाला आणि तल्हा खान या दोघांविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केले होते. दोन्ही आरोपींची ठोस माहिती देणाऱ्यास तीन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.एनआयएने पुण्यातील २०२३ च्या आयईडी प्रकरणात आधीच आयएसआयएसशी संबंधित आठ जणांना अटक केली आहे.


## टी.सी हरवली

माझी पुनाम कामाजी भारती या नावाची बी.एस्सी तृतीय वर्षाची टी.सी.सिडको ते नांदेड ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता–**
**पुनम कामाजी भारती**
**रा.गोपाळचावडी ता.जि.नांदेड मो.८३९०५२५२००**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## Change In Name

My old Name is SHIVAPALSINGH KHUSALSINGHTHAKUR which now I am Changing as New Name SHIVPALSINGH KHUSHALSINGH THAKUR Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same, ADD-SHIVPALSINGHTHAKUR PURNA DIST PARBHANI MO.9767274222

## Change In Name

My old Name is DIGAMBAR MAHADU TAPASKAR which now I am Changing as New Name DIGAMBAR MADHAVRAO TAPASKAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, Sign by. DIGAMBAR MADHAVRAO TAPASKAR

CURRENT ADD-63 MRUDGANDH GANDHI NAGAR MAHARANA PRATAP CHOUK TARODA BK PO TARODA TQ. NANDED DIST NANDED 431605

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार माझे पक्षकर नितीन पि. राघोजी कांबळे, वय:- २८ वर्षे, धंदा:- शेती, रा. पिंपळदरी ता.लोहा जि.नांदेड येथील रहिवाशी असुन त्यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहिर प्रगटन देण्यात येत आहे की,

माझे पक्षकाराचे शेत गट क्र. २०३ मधील क्षेत्रफळ १ हे. ०८ आर व शेत गट क्र.२५४ मधील क्षेत्रफळ १ हे. ३५ आर स्थित मौजे पिंपळदरी ता.लोहा जि.नांदेड येथील आहेत.

सदरील जमीन ह्या एकत्र कुटूंबाची मालमत्ता असुन सदर मालमत्तेमध्ये माझी पक्षकार हे या जमीनीमध्ये वाटणीने सहहिस्सेदार आहे. माझे पक्षकार १) नितीन पि. राघोजी कांबळे (नातु), २) इंदरबाई राघोजी कांबळे (सुन), ३) पारूबाई निवृत्ती सोनटके (मुलगी), ४) सुमनबाई यशवंत तारू (मुलगी), ५) भास्कर पि.राघोजी कांबळे (नातू), ६) नितीन पि. राघोजी कांबळे (नातु), ७) साहेबराव पि.राघाजी कांबळे (नातू) आहे व आम्ही सर्व या जमीन जायजादीमध्ये सहहिस्सेदार आहोत व आजपर्यंत या जमीनीच्या कोणत्याही प्रकारच्या वाटण्या झालेल्या नाहीत. माझे पक्षकाराने सदर जमीन जायजादी संदर्भाने चाटणी करून स्वतंत्र ताबा मिळावा म्हणुन मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर लोहा येथे दावा दाखल करणार आहेत.

तरी वरील व्यक्तीच्या नावावरील कोणत्याही गटाच्या जमीनी संबंधाने खरेदी-विक्री चे अथवा सौदाचिठ्ठीचे व्यवहार करू नयेत तसेच हस्तांतराचे देखील व्यवहार करू नयेत कारण माझे पक्षकाराची वरील व्यक्तीच्या नावे असलेल्या जमीनीत हितसंबंध असून कायदेशिर हिस्सा

आहे. तसेच वर नमुद जमीनीमध्ये माझे पक्षकार व इतरांनी कोणत्या चतु:सिमेत जमीनी वहिती करायच्या ही बाब ठरलेली नाही त्यामुळे जर कोणीही वरील प्रमाणे व्यवहार वरील व्यक्तीसोबत केल्यास त्या व्यवहाराची जबाबदारी माझे पक्षकाराची राहणार नाही तसेच अशा व्यक्तीस दाव्यात पार्टी केले जाईल व खरेदीखत अथवा केलेला व्यवहार माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**तर्फे**
**ॲड.पी.एम.शेटे**
**कोर्ट लोहा**

**जाहीर प्रगटन देणार**
**नितीन राघोजी कांबळे**
**रा.पिंपळदरी ता.लोहा जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

मौजे नसरतपुर हद्दीतील सर्व्हे नंबर २४/ब प्लॉट नंबर ४० आर रश्मी उमेश पेकम यांचेकडून शमीम बेगम रूस्तुम शेख २ राणी नागनाथ कदम यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम देण्यात आली आहे.

**प्लॉटची चर्तुसिमा**

**पुर्वेस-रविशसिंह रमेशसिंह तेहरा यांचे शेत, पश्चिमेस- सुलोचना सुभाष सिंह तेहरा यांचे शेत, दक्षिणेस- हस्सापुर नसरतपुर शिव आहे, उत्तरेस- सदरील गट नंबरची उर्वरीत शेत जमिन आहे.**

तरी वरील चर्तुसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी सरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन देत आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
**१.शमीम बेगम रूस्तुम शेख**
**२. राणी नागनाथ कदम**
**मो.९७६७५५०९७५,९३७३१४३१२६**

## त्वरीत जागा भरणे

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त सामाजिक न्याय विभाग
समाजकल्याण आयुक्तालय तर्फे अनुदानित वसतिगृह
**आनंदमयी सेवाश्रम कौठा जुना नांदेड द्वारा संचलित**

**आनंदमयी हॉस्टेल्स कौठा (जुना) नांदेड ता.जि.नांदेड**

सदरील शासन मान्य अनुदानित मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहात खालील प्रमाणे जागा भरणे आहे.तरी इच्छूक पात्र व गरजू उमेदवारांनी मुळ कागदपत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | मदतनिस | १० वी उत्तीर्ण | १ | शासन नियमाप्रमाणे |

मुलाखत दिनाक २/६/२०२५
मुलाखत वेळ सकाळी ११.०० वाजात
मुलाखत स्थळ-आनंदमयी हॉस्टेल्स कौठा (जुना) नांदेड ता.जि.नांदेड

**अध्यक्ष**
आनंदमयी हॉस्टेल्स कौठा (जुना) नांदेड ता.जि.नांदेड

**ट्रटी तथा नियंत्रकु**
आनंदमयी हॉस्टेल्स कौठा (जुना) नांदेड ता.जि.नांदेड
मो.९०२८११९३१२

**अधिक्षक**
आनंदमयी हॉस्टेल्स कौठा (जुना) नांदेड ता.जि.नांदेड
मो.८४५९३७३४३९

## पाहिजेत

सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ (धार्मिक अल्पसंख्यांक संस्था दर्जा प्राप्त) संचलित मिलिंद विद्यालय कुंडलवाडी (१००% अनुदाणित) ता. बिलोली जि.नांदेड या शाळेत खालील प्रमाणे पदे भरावयाची आहेत.तरी इच्छुक उमेदवारांनी त्यांच्या मुळकागदपत्रांसह व छायांकितप्रतीसह दिनांक २०/०५/२०२५ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता मुलाखतीस उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाची संख्या | वर्ग | पदाचे नाव | राखीव प्रवर्ग | विषय | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ९ वी व १० वी | शिक्षण सेवक | अराखीव | खेळ | B.Sc./BA/B. COM, B.P.Ed. किंवा समकक्ष |

**ही पदे अनारक्षित असुन कोणत्याही प्रर्वगाच्या उमेदवारास मुलाखत देता येईल.**

**अध्यक्ष**
सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ
कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

**सचिव**
सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ
कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

**मुख्याध्यापक**
मिलिंद विद्यालय
कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# सोनखेड ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू ठेक्यावर कारवाई

## दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचा दणका

**नांदेड (प्रतिनिधी)** – वाळूमाफीयाकडून अवैध मार्गाने वाळू उपसा व वाहतूक करून शासनाचा लाखो रूपयांचा महसुल बुडविला जात असल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या पथकामार्फत सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई केली. यावेळी पोलिसांच्या हाती अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांचे मोठे रॅकेट लागले आहे. जवळपास दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बेट सांगवी (कपीलेश्वर) गोदावरी नदी पात्रात अवैधरित्या वाळु उपसा होत असल्याची माहिती स्थागुशाचे निरीक्षक उदय खंडेराय यांना मिळाली. त्यानंतर खंडेराय यांनी पथकाला सोबत घेऊन १६ मे रोजी पहाटे ४ च्या सुमारास सोनखेड हद्दीतील बेट सांगवी (कपीलेश्वर) येथील गोदावरी नदी





पात्रात छापा मारून कारवाई केली. यावेळी अवैध वाळू उपसा करणारे ८ इंजीन किमत २४ लाख रूपये, ४६ तराफे किंमत ११ लाख ५० हजार रूपये, पंधरा ब्रास वाळुसह ३ हायवा किंमत १ कोटी ३५ लाख ७० हजार रूपये, ३५ ब्रास वाळू किमती १ लाख ७५ हजार रूपये असा एकुण १ कोटी ७२ लाख ९५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच त्यातील तराफे जाळुन नष्ट करण्यात आले. एकुण ११ आरोपींवर कार्यवाही करून मुद्देमाल सोनखेड पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करून गुन्हे दाखल करण्यात आले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सोनखेड ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, स्थागुशाचे पोउपनि आनंद बिच्चेवार, मिलिंद सोनकांबळे, पोउपनि आशिष बोराटे, पोउपनि माधव केंद्रे, हवालदार रवी बामने, स्वामी, शंकर म्हैसनवाड, सुरेश घुगे, प्रभाकर मलदोडे, विश्वनाथ पवार, टोनगे, बालाजी यादगीरवाड, चालक देवकत्ते, बामने, चालक घेवारे, चालक लोणे, चालक श्रीरामे, सपोउपनि गिते, ज्ञानोबा कवठेकर, नागरगोजे, कवाळे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

आरोपी देविदास बापुराव सोनटक्के रा. शेवडी बा. ता. लोहा जि. नांदेड, नागनाथ बाबाराव लुटे रा.शेवडी बा. ता. लोहा जि. नांदेड, कृष्णा लुटे रा.शेवडी बा.ता.लोहा जि. नांदेड, रामेश्वर सखाराम गवते रा. पेनुर ता. लोहा, अनिल घोडके रा. पेनुर ता. लोहा जि. नांदेड, गोविंद वानखेडे रा. बेट सांगवी कपिलेश्वर ता. लोहा, मंगेश राजाराम आव्हाड रा. पेनुर ता.लोहा, अमोल रोहीदास गवते रा.पेनुर ता.लोहा, राजु पंढरी गवते रा. पेनुर ता. लोहा जि. नांदेड, आप्पाराव राजळे रा. पेनुर ता. लोहा जि. नांदेड, विजय शिवाजी राठोड रा. काशीराम तांडा ता. कंधार यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले.

# भाजप मंत्री विजय शाह यांच्या विरोधात खा. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत काँग्रेसची निदर्शने



**नांदेड (प्रतिनिधी)** – ऑपरेशन सिंदूरचा मुख्य चेहरा असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्या विषयी मध्यप्रदेशचे भाजपा मंत्री विजय शाह यांनी अवमानजनक वक्तव्य केले. दरम्यान नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत व महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली शनिवार दि.१७ रोजी भाजप मंत्री विजय शाह यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करत त्यांचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी मंत्री विजय शाह यांच्या राजीनाम्याची मागणी देखील करण्यात आली.

देशाचा अभिमान असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्या बद्दल मध्यप्रदेशचे भाजपा मंत्री विजय शाह हे अवमानकारक विधान केले, यावर न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तरी देखील मंत्री विजय शाह यांचा राजीनामा भारतीय जनता पार्टी घेत नाही. हाच भाजपाचा खरा चेहरा आहे, अशी टीका यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांनी केली. दरम्यान खा. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत व महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली दि.१७ रोजी, नवा मोंढा येथील शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालय येथे मंत्री विजय शाह यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करत त्यांचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी मंत्री विजय शाह यांच्या राजीनाम्याची मागणी देखील करण्यात आली. या आंदोलनात महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेंद्र घोडजकर, राजेश पावडे, अनिल मोरे, अब्दुल गफार, बालाजी चव्हाण, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, श्रीनिवास मोरे, अजिज कुरेशी, मुन्ना अब्बास, मुन्तजिब, माधवराव पवळे, नसिम पठाण, ज्योती कदम, रफिक पठाण, दिपकसिंग हजुरीया, संजय वाघमारे, गगन यादव, अतुल पेदेवाड, पिंटू पाटील आलेगावकर, शेख मुख्तार, तुषार पोहरे, धनंजय उमरीकर, गणेश कोकाटे, प्रसेन्नजित वाघमारे, गौतम सिरसाट, गोविंद पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**नांदेड** : अखिल भारत पद्मशाली संघम हैदराबाद संचलित मराठवाडा पद्मशाली महासभाअंतर्गत नांदेड जिल्हा पद्मशाली युवक संघटना व मराठवाडा पद्मशाली महिला संघटनेच्यावतीने मातोश्री मंगल कार्यालयात पद्मशाली समाजाच्या १२ जोडप्यांचा सामुहिक विवाह संपन्न झाला. या प्रसंगी नवदाम्पत्यांना शुभेच्छा देताना माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण, माजी आ. अमरनाथ राजूरकर, उद्योजक विजय भंडारी, नागनाथ गड्डम, सौ. कविता गड्डम, भारत गट्टेवार, लक्ष्मीकांत गोणे, किशोर स्वामी, श्रीधर सुकरवार, तुलसीदास भुस्सेवा, प्रल्हाद सुकरवार, संजय निलपत्रेवार, बालासाहेब मादसवाड, गोविंद कोकुलवार, सुभाष बल्लेवार, श्रीनिवास भुसेवार, अशोक श्रीमनवार, व्यंकटेश जिंदम, शिवप्रसाद चन्ना आदी. (छाया : नरेंद्र गडप्पा)

# अर्धापुरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस; बामणी येथे वीज पडून जनावर दगावले

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यात वादळीवारा व अवकाळी पावसाने शेतीचे नुकसान झाले आहे. तर शुक्रवारी सायंकाळी तालुक्यातील बामणी येथे वीजेमुळे एका जनावराचा मृत्यू झाला. शनिवारी (दि.१७) दुपारी वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले. अनेक गावातील केळीच्या बागा आडव्या पडल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अर्धापूर तालुक्यातील काही भागात दोन दिवसांपासून अवकाळी पावसाचा जोर कायम होता. तासभर पडलेल्या या पावसामुळे अनेक रस्ते जलमय झाले होते. अनेक ठिकाणी पाणी साचले होते. तुफान वादळी वाऱ्यामुळे अनेक भागातील झाडे उन्मळून पडली. बामणी येथे पुन्हा केळीची झाडे आडवी पडून नुकसान झाले आहे. येथील शेतकरी देवानंद ग्यानदेव चिंतले यांची म्हैस वीजपडून दगावली. शेतकऱ्यांचे ७० हजार रूपयांचे नुकसान झाले आहे. तर खडकी येथे प्रकाश मधुकर रणखांबे यांच्या घरावर झाड पडल्याने घर व अंगणात असलेल्या मोटारसायकलचे २० हजार रूपयांचे नुकसान झाले आहे.





दोन्ही घटनांचा पंचनामा करण्यात आला आहे. यावेळी तलाठी, ग्रामसेवक, सरपंच साहेबराव कदम, उपसरपंच लिंगोजी चिंतले, महसूल सेवक साईनाथ मिसे आदींची उपस्थिती होती. नुकसानग्रस्त शेतकऱ्यास तात्काळ मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमत नांदेड पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी

## पोलीस दलातील कार्यालयांचा पुरस्कार देऊन केला गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)** – मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा उपक्रमात पोलीस कार्यालयांनी विशेष कामगिरी बजावली आहे. या कामगिरीची दखल घेऊन नांदेड जिल्ह्यातील पोलीस कार्यालयांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड पोलीस दलांने मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला. या मोहिमेत अनेक उपक्रम राबविले. वेबसाईटचे अद्यावतीकरण करण्यात आले. ईज ऑफ लिव्हींगची सुरूवात करण्यात आली त्या अंतर्गत नागरीकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने पेट्रोलींगची सुरुवात करण्यात आली. त्या अनुषंगाने शहरात एकुण ७५४ व





(संग्रहित छायाचित्र)

ग्रामीण भागात एकूण ७३१ ठिकाणी टी कोड लावण्यात आले. तक्रार निवारण कक्ष स्थापण करण्यात आले. व दर शनिवारी तक्रार निवारण दिन साजरा करून आज पावेतो १,८११ तक्रारीचे निवारण करण्यात आले.

नांदेड जिल्हा पोलीस कार्यालयात दर मंगळवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जुने रेकॉर्ड यांची छाननी करून आवश्यक रेकॉर्ड जतन करण्यात आले. त्याचे अ, ब रेकॉर्ड करून निर्गती केली. जुन्या वाहनांचे लिलाव करण्यात आले. मुद्देमालांचा पंचनामा करून मुद्देमाल नष्ट करण्यात आले. जिल्हा पोलीस दलाच्या कार्यालयात पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची स्वच्छता, सर्व कार्यालयात दिशा दर्शक फलक कार्यालयाचे परिसराचे सुशोभीकरण, सुसज्ज प्रतिक्षालय या सोई सुविधा करण्यात आल्या. गुंतवणुक प्रसार करण्यात आला. कोचींग इंस्टीटयुटना भेटी देण्यात आल्या. सर्व क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देण्यात आल्या. ऑपरेशन बिट कनेक्ट राबवीण्यात आले. मिशन उडाण, ऑपरेशन वारसा जतन, नांदेड पोलीस लिग, मिशन निर्भया, मिशन समाधान, मिशन निर्धार, मिशन एकता असे उपक्रम राबविण्यात आले.

## पान १ वरून...

### दिल्ली महापालिकेत...

देत वेगळा गट तयार केला आहे.

आपल्यासोबत आप पक्षातून बाहेर पडलेले १५ नगरसेवक असल्याचा दावा बंडखोरांचे नेते मुकेश गोयल यांनी केला आहे. आपच्या अरविंद केजरीवाल यांच्यासमोर हे मोठं आव्हान असल्याचं सांगितलं जात आहे. मुकेश गोयल आणि हेमचंद गोयल हे आधी काँग्रेस पक्षामध्ये होते. गेल्या निवडणुकीवेळी त्यांनी आप पक्षामध्ये प्रवेश केला होता. मुकेश गोयल यांनी आप पक्षाकडून आदर्श नगर विधानसभा निवडणूकही लढवली होती. पण त्यांचा पराभव झाला.

दिल्लीमध्ये आप पक्षाच्या नगरसेवकांनी राजीनामा देत वेगळा गट निर्माण केल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. आपच्या नगरसेवकांनी राजीनामा दिल्यानंतर आपकडून अधिकृत निवेदन अद्याप आलं नाही. या आधी महाराष्ट्रातही असंच राजकारण पाहायला मिळालं होतं. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत आमदारांनी बंड केला. नंतर पुढे जाऊन त्यांनी मूळ पक्षावर दावा केला. निवडणूक आयोगानेही त्यांच्या बाजूने निर्णय देत शिवसेना त्यांचीच असल्याचं सांगितलं होतं.



**लोहा** : मे महिन्यातील पहिल्याच अवकाळी पावसाने लोहा-शेवडी-बेटसांगवी-भनगी मार्गे वाडीपाटील नांदेडला जोडणारा रस्ता बंद झाला आहे. या रस्त्याचे पन्नास मिटरचे काम न झाल्यामुळे शेतकऱ्यांसह प्रवाशांचे बेहाल होत आहे. (छाया : विनोद महाबळे.)

### नांदासौख्यभरे

**जोगदंड–हसनाळकर**

शीला डॉ. बबनराव जोगदंड रा. पुणे यांचे ज्येष्ठ चिरंजीव, पंडितराव जोगदंड यांचे नातू आयु. सुमंत यांचा मंगल परिणय हेमलता का. प्रा. पंढरीनाथ हसनाळकर (मादाळे) गोदावरीबाई का. प्रा. डॉ. सत्यजीत चिखलीकर यांची नात रा. तथागतनगर, नांदेड आयु. अनघा हिस सोबत आज रविवार, दि. १८ मे, २०२५ रोजी सकाळी ११.०५ वाजता श्रीनिवासा गार्डन अॅण्ड मंगल कार्यालय गुरूजी चौक, छत्रपती चौकाच्या पुढे येथे सानंद संपन्न होत आहे.

वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

**–मुख्य संपादक**

### नांदासौख्यभरे

**मोरताळे–काळे**

कै. लक्ष्मणराव तुळशिराम मोरताळे पा. यांची नात व सौ. सुनंदा व श्री. दीपक लक्ष्मणराव मोरताळे पा. यांची ज्येष्ठ कन्या चि.सौ.कां. यशस्वी हिचा शुभविवाह श्री. दत्तात्रय केरबाराव काळे पा. यांचे नातू व सौ.पूनम व श्री. सतीश दत्तात्रय काळे पा. यांचे ज्येष्ठ चिरंजीव यांच्यासोबत आज रविवार, दि. १८ मे, २०२५ रोजी सकाळी १०.२२ वाजता चांदोजी पावडे मंगल कार्यालय डी-मार्ट जवळ, कॅनाल रोड, नांदेड येथे सानंद संपन्न होत आहे.

वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

**–मुख्य संपादक**

हा र्दि क अ भि नं द न!



आयुष पाळेकर 97.60%
संचिता लाभशेटवार 93.20%
वैष्णवी महाजन 60.20%

शालांत परीक्षेत मुखेड शहरातील प्रसिद्ध व्यापारी, किर्ती गोल्ड तेलाची एजन्सी, अमर ट्रेडिंगचे मालक **श्री अमर गणपतराव पाळेकर यांचे चिरंजीव**
**आयुष अमर पाळेकर**
हे दहावीच्या परीक्षेत **97.60%** गुण, **जयप्रकाश लक्ष्मणराव लाभशेटवार बावलगावकर** रा. देगलूर याची द्वितीय कन्या
**संचिता जयप्रकाश लाभशेटवार**
93.20% गुण तसेच **गणपतराव मनोहरराव पाळेकर याची नातं**
**वैष्णवी विशाल महाजन**-मुंबई हिने **60.20%** गुण घेतल्याबद्दल
**हार्दिक अभिनंदन!**

**************************************************

शूभेच्छूक : **अरूण रमाकांत गादेवार**-पूणे, **महेश बाबुराव निलावार**-नांदेड, **विशाल बबनराव महाजन**-मूबई, **सूशांत बाळासाहेब सम्मनवार**-नागपूर, **महेश जगळपूरे**-लातूर, **दिंगाबर विठ्ठलराव पडगीलवार**-सिडको नांदेड, **गणपतराव मनोहरराव पाळेकर**-मूखेड, **रामराव मनोहरराव पाळेकर**-मुखेड, **ज्ञानेश्वर मनोहरराव पाळेकर**-कौठा-नांदेड, **राजेश्वर मनोहरराव पाळेकर**-कौठा नांदेड, **डॉ.अविनाश रामराव पाळेकर**-अश्विनी डेंटल क्लिनिक मुखेड, **डॉ.महेश ज्ञानेश्वर पाळेकर**-पाळेकर पॅथॉलॉजी नांदेड, **डॉ.संगीता सूशांत सम्मनवार**-प्राध्यापक, बाबा रामदेव इंजिनिअरींग महाविद्यालयात, नागपूर, **मनोज गणपतराव पाळेकर**-घडी साबनचे होलसेल व्यापारी, मुखेड, **पांडूरंग राजेश्वर पाळेकर**-पुणे, **ऋषिकेश राजेश्वर पाळेकर**-पुणे, **राजेश्वर लक्ष्मणराव लाभशेटवार**-प्रसाद किराणा आणि जनरल स्टोअर्स सिडको नांदेड, **जयपकाश (संतोष) लक्ष्मणराव लाभशेटवार**-श्रीनिवास किराणा आणि जनरल स्टोअर्स देगलूर, **कुशल अरूण गादेवार**- पूणे **बालाजी राम लाभशेटवार**-नायगांव, **प्रसाद राजेश्वर लाभशेटवार**-सिडको नांदेड, **बालाजी नागनाथ गोरशेटवार**-बा-हाळी मुखेड, **नरेश दिलीपराव गडम**-शाखाधिकारी-स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा तुळजापूर, **कपिल केरबा मोरलवार**-उदगिर, **गणेश बालाजी पईतवार**-सिए.पुणे

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com